
बुधवार । ३० सप्टेंबर ७० । चालीस पैसे

# माणूस

## गुलाबदास ब्रोकर



मी भाग्यवान् लेखक आहे.
जिथं रुपयाभर कौतुक वाट्याला यावं
तिथं चार आणे जास्तीच येतं.

बुधवार, ३० सप्टेंबर १९७०

# माणूस

| | | |
|---|---|---|
| वर्ष : दहावे | संपादक | सहाय्यक |
| अंक : बाविसावा | श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर |
| | | सौ. निर्मला पुरंदरे |

| | | |
|---|---|---|
| किंमत | वार्षिक वर्गणी | परदेशची वर्गणी |
| चाळीस पैसे | तीस रुपये | साठ रुपये |


## सप्रेम नमस्कार....

बँक राष्ट्रीयीकरणाचे एक वर्ष : ठेवी का घटल्या ? या शीर्षकाचा माझा लेख आपण २२।८।७० च्या 'माणूस' मधून प्रसिद्ध केल्यानंतर गेल्या महिन्याभरात 'माणूस'च्या वाचकांच्या पत्रव्यवहारात तो 'लेख' अनेकवार आला. लेखात व्यक्त केलेल्या मतावर अनुकूल–प्रतिकूल अशी टीकाही आली. बँकांच्या राष्ट्रीयीकरणाच्या विषयावर आपल्या वाचकांचे दृष्टिकोन किती मनस्वी आणि नाजूक आहेत याची कल्पना आली. मनाला बरे वाटले. माझ्या लेखावर अशी चर्चा घडवून आणल्या-बद्दल सर्व पत्रलेखकांचा मी ऋणी आहे.

माझ्या लेखासंबंधी सर्वच पत्रमित्रांचे मत चांगले असूनही त्यांनी काही मतभेद नोंदविले आहेत. ते असे–

१ : ग्रामीण भागात उघडल्या जाणाऱ्या बँकांच्या कर्मचाऱ्यांची वेतनश्रेणी तेथील राहाणीमानाशी आणि तशाच प्रकारच्या गुणवत्तेची जी इतर मंडळी, तशाच प्रकारचे काम ग्रामीण भागात करतात, त्यांच्या वेतनश्रेणीशी मिळती-जुळती असावी या माझ्या विधानाची एक 'अजब सूचना' म्हणून संभावना झाली. यात माझे 'अज्ञान' उघड झाले. मला ग्रामीण भागात काम करणाऱ्यांची दुःखे समजली नाहीत. ग्रामीण भागातील स्थानिक किंमतपातळी–हरितक्रांतीने श्रीमंत झालेल्या शेतकऱ्यांमुळेही वाढली असली तरी त्याचा परिणाम सर्वसामान्य जनतेवर विपरीत झालेला नाही, मग बँककर्मचाऱ्यांच्या पगारामुळे तो परिणाम कसा होईल ? असे प्रश्न उपस्थित केले गेले.

द्विसाप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी 'माणूस' द्विसाप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक

यावर मी एवढेच म्हणेन, माझी सूचना ' अजब ' नाही, ती पूर्णतया व्यवहारी दृष्टीवर आधारित आहे. ही सूचना मूलतः स्टेट बँकेचे अध्यक्ष श्री. आर. के. तलवार यांनी मांडली आहे. मी स्वतः गेली दहा वर्षे ग्रामीण भागातच काम करीत असल्याने मी त्यांच्या सूचनेत माझ्या अनुभवांची भर घातली एवढेच. ग्रामीण भागातील हरितक्रांतीमुळे श्रीमंत झालेल्या मंडळींची श्रीमंती गरीब – भूमिहीनांना खटकू लागल्याचे ठिकठिकाणी प्रत्ययाला येत आहे. हा असंतोष अनेक मार्गांनी व्यक्त होत आहे. शिवाय नव्याने ग्रामीण भागात जाणाऱ्या बँककर्मचाऱ्यांचे लठ्ठ पगार समव्यावसायिकांच्या मनात तर खटकतातच, पण कामाच्या दृष्टीनेही ते योग्य नाहीत असे मानायला जागा आहे. शहरी बँकांचा एजंट व ग्रामीण बँकांचा एजंट यांच्या कामात फरक असतोच. ग्रामीण भागात काम करणाऱ्यांना अधिक पगार द्यावा व तो त्यांच्या सेवानिवृत्तीपर्यंत मुदती ठेवीत गुंतवावा–ही सूचना योग्य. पण त्यामुळे खेड्यात जाणाऱ्या कर्मचाऱ्यांचा ' फाल्गुनमास ' सुसह्य होईल का ?

बँककर्मचाऱ्यांच्या लठ्ठ पगारावर माझा मुळीच डोळा नाही. अर्थशास्त्राचा प्राध्यापक या नात्याने मला जे वाटले ते मी लिहिले. बँककर्मचाऱ्यांनी आपली वेतन-श्रेणी कशी मिळवली हे तर सर्वश्रुतच आहे ! आज संपाची भाषा करून काहीही मिळवता येते, याचा अर्थ ती गोष्ट न्याय्य असते असे नाही.

२ : ठेवी वाढविण्यासाठी व्याजाच्या दरात वाढ का करीत नाहीत ? अशीही एक शंका उपस्थित करण्यात आली आहे. त्याचे माझ्या मताप्रमाणे उत्तर असे : छोट्या बचतदारांची ठेव ही व्याजाचा दर वाढविल्याने वाढण्याची शक्यता कमी आहे. कारण त्यांची ठेवच एवढी लहान असते की व्याजाचा दर वाढल्याने त्यांच्या मिळ-कतीवर विशेष परिणाम संभवत नाही. श्रीमंत बचतदारांची ठेव हीही व्याजाचा दर वाढल्याने वाढेल असे नाही. बँका जी पतचलन निर्मिती करतात त्यात ठेवीतून कर्जे आणि कर्जातून ठेवी निर्माण होत असतात. त्यामुळे वाढलेले व्याजाचे दर ठेवी घटविण्याचीच शक्यता असते, कारण कर्जदारांना कर्जे महाग पडली तर ते कर्जे घेणार नाहीत व त्यावर अधिष्ठित असलेल्या ठेवी घटतील.

ज्या कर्जाधिष्ठित ठेवी नाहीत त्या व्याजाचा दर वाढल्याने वाढतील असे मानले तरी मग बँकांचे कर्जावरील व्याजाचे दर एवढे वाढतील की ते या देशातील कर्ज-दारांना परवडणार नाहीत.

ठेवीवरील व्याजाचे दर वाढवून अर्थव्यवस्थेला गतिमान करण्यात जर्मनीला यश आले असले तरी तो प्रयोग या देशात यशस्वी होण्याची शक्यता वाटत नाही. त्या देशातील लोकांची राष्ट्रीयवृत्ती, अर्थव्यवस्थेत असलेली एक शिस्त, उत्पादनातील कार्यक्षमता अशा अनेक गोष्टी आपल्या देशातील परिस्थितीशी तुलता येण्यासारख्या नाहीत. शिवाय जर्मनीची औद्योगिक परंपरा आणि आपली औद्योगिक परंपरा यात खूपच अंतर नाही का ? कळावे,

आपला,

रा. म. बिवलकर

दिल्ली दरबार

# आज धोका नाही पण उद्या ?

राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी प्रधानमंत्र्यांच्या निमंत्रणाला मान देऊन वर्षातून एकदा दिल्लीला जमायचे आणि जमीन-धारणेच्या प्रश्नांची चर्चा करायची हा एक परिपाठच होऊन बसला आहे. गेल्या शनिवार–रविवारीही मुख्यमंत्री दिल्लीत जमले आणि ग्रामीण भागात सामाजिक आणि आर्थिक न्यायाचे तत्त्व कार्यवाहीत आणणे किती अगत्याचे आहे याबद्दल सर्वांनी माना डोलावून संमती दिली. परंतु त्या दृष्टीने प्रत्यक्ष पावले टाकायला कोणत्याच राज्याचा मुख्यमंत्री तयार होत नाही असा आजवरचा अनुभव आहे. गेल्या नोव्हेंबरमध्ये भरलेल्या मुख्यमंत्र्यांच्या बैठकीत अशीच चर्चा झाली होती; परंतु त्यानंतर गेल्या आठ-दहा महिन्यांमध्ये कोणत्याही एका राज्यामध्ये जमीन–धारणेच्या कायद्याच्या कार्यवाहीला गती प्राप्त झाली आहे असे म्हणता येणार नाही.

'कसणाऱ्याची जमीन' या तत्त्वाचा पुकारा झाल्याला बरीच वर्षे होऊन गेली, त्या दृष्टीने विधानसभांमध्ये कायदेही संमत झाले; परंतु तरीही भूमिहीन शेतकऱ्यांची समस्या कायमच आहे. यावरून या प्रश्नासंबंधी राज्यकर्त्यांना जेवढा जिव्हाळा वाटावा अशी अपेक्षा आहे तेवढा वाटत नाही असेच म्हणावे लागते. अद्यापही उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, राजस्थान आदी राज्यांमध्ये बडेबडे जमीनदार अस्तित्वात असून हजारो शेतकऱ्यांना त्यांच्या मेहेरबानीवर जगावे लागत आहे. जमिनीची ही मक्तेदारी नष्ट व्हावी म्हणून जमीन–धारणेच्या कमाल मर्यादाही निश्चित करण्यात आलेल्या आहेत. ही मर्यादा पंधरा ते पंचवीस एकरांपर्यंत निश्चित करण्यात यावी असे केंद्र सरकारने सुचविले असून त्या दृष्टीने कायदे करण्याची जबाबदारी राज्यसरकारांवर येते.

गेल्या काही वर्षांत निरनिराळ्या राज्यांमध्ये जे कूळ–कायदे करण्यात आले त्यातील पळवाटा शोधून काढून बऱ्याच जमीनदारांनी आपल्या विशाल जमिनीची मालकी स्वतःकडे ठेवण्याची कारवाई केलेली आहे. अशा तऱ्हेचे अनेक अनुभव आल्यानंतर विद्यमान कायद्यातील या पळवाटा बंद करण्याच्या दृष्टीने उपाययोजना करणे आवश्यक होते. पण सर्व राज्य–सरकारांकडून त्या बाबतीतही दिरंगाई होत आहे. जमीन–धारणाविषयक कायद्यांची काटेकोर कार्यवाही करण्यासाठी सरकार-

जवळ जमिनीच्या मालकीसंबंधीचे सारे तपशील उपलब्ध असावयास हवेत. म्हणून प्रत्येक राज्यसरकारचे पहिले कर्तव्य हे आहे की जमिनीच्या मालकी–हक्कासंबंधीचे आपल्या जवळचे उतारे वास्तव परिस्थितीशी सुसंवादी आहेत की नाहीत याची खातरजमा करून घेतली पाहिजे. त्याचप्रमाणे जमीन–धारणाविषयक कायद्यातील संदिग्धता आणि क्लिष्टता दूर करून, चटकन कोणालाही बोध होऊ शकेल अशा रीतीने या कायद्यांची फेरआखणी करायला हवी. जमिनीवरील आपला अधिकार शाबित करण्यासाठी असंख्य कुळांना न्यायालयाकडे धाव घ्यावी लागते व तेथे जमीनदारांच्या दडपणामुळे हे खटले वर्षेच्या वर्षे रेंगाळत राहतात. न्यायदानाला विलंब करणे म्हणजे न्याय नाकारणे होय. हे सूत्र याबाबतीतही कटाक्षाने पाळले गेले पाहिजे आणि तसे ते पाळले जात आहे किंवा नाही याबद्दल राज्य–सरकारांच्या अधिकाऱ्यांनी योग्य ती दक्षता घ्यायला हवी.

राज्य–सरकारांनी आपली ही जबाबदारी पार पाडली नाही तर केंद्र सरकार काय करणार आहे हा खरा प्रश्न आहे. कारण इतर अनेक बाबतीतही उत्साही असणारी राज्य–सरकारे बड्या शेतकऱ्यांना दुखवायला तयार होत नाहीत ही वस्तुस्थिती प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांनाही पुरती माहीत आहे. जमीनविषयक कायदे हा राज्य–सरकारांच्या अखत्यारीतील विषय असल्यामुळे केवळ प्रवचन देण्यापेक्षा केंद्र सरकारला काहीही करता येत नाही. भूमिहीन शेतकऱ्यांमधील असंतोषाला संघटित करण्यासाठी ठिकठिकाणी नक्षलवादी कार्यकर्ते प्रयत्नशील झाले आहेत. त्यामुळे आगामी निवडणुकीमध्ये या कोटयावधी मतदारांची मते आपल्याला मिळावयाची असतील तर त्यांच्या गाऱ्हाण्यांकडे तातडीने लक्ष दिले पाहिजे हे श्रीमती इंदिरा गांधी यांना उमगून आलेले आहे. परंतु राज्य–पातळीवरील कार्यकर्त्यांना ज्या जिल्हा–पातळीवरील नेतृत्वाकडून आधार मिळतो ते नेतृत्व मुख्यतः


## हिंदु विवाह व घटस्फोट कायदा

ले. – ॲड. कुलकर्णी व पटणी, पुणे

या ज्वलंत विषयावर पुण्यातील अनुभवी व व्यवसायी वकिलांनी लिहिलेले पहिलेच पुस्तक. कायदेशीर ताटातूट, निरर्थक विवाह, नपुंसकत्व पोटगी, वगैरे विषयावर हायकोर्टाच्या व सुप्रीम कोर्टाच्या निकालावरून सोदाहरण केलेले स्पष्टीकरण. किं.५ रु. म. ऑ. पाठवा.

लॉ बुक हाऊस, ५४३ सदाशिव, पुणे ३०

जमीनदारांचे आणि बड्या शेतकऱ्यांचे आहे. त्यामुळे राज्य-सरकारची धुरा सांभाळणारे नव-काँग्रेसचे शिलेदार आपल्या आश्रयदात्यांना दुखवायला तयार होण्याचा फारसा संभव नाही.

या संदर्भात दीड वर्षापूर्वी भरलेल्या मुख्यमंत्र्यांच्या बैठकीतील एका संवादाची आठवण येते. त्यावेळी हरियानामध्ये लोकनियुक्त सरकार अस्तित्वात नसल्यामुळे त्या राज्याचे राज्यपाल श्री. बी. एन. चक्रवर्ती या बैठकीला हजर होते. जमीन-धारणेसंबंधीचे कायदे अंमलात आणताना राज्य-सरकारे का बिचकतात हे आपल्याला समजत नाही असे ते म्हणताच भोवतालचे मुख्यमंत्री म्हणाले, 'तुम्हाला ते समजायचं नाही. कारण तुम्हाला निवडणूक लढवायची नसते.'

गेल्या शनिवारी भरलेल्या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी जमीन-धारणेसंबंधीच्या उदात्त तत्त्वाला मान डोलावली असली तरी आणखी वर्ष-दीड वर्षाने आपल्याला निवडणूक लढवायची आहे आणि त्यावेळी आपल्याला कोण निवडून देणार आहे हे त्यांना पुरतेपणी ठाऊक आहे. मात्र हे आपले तात्कालिक स्वार्थाचे धोरण अंतिम हिताचे नव्हे हे या मुख्यमंत्र्यानी ओळखले पाहिजे. गेल्या नऊ ऑगस्टपासून तीन डाव्या पक्षांनी हाती घेतलेल्या भूमि-मुक्ती आंदोलनाचा ताबडतोब परिणाम जाणवला नाही तरी गेली कित्येक वर्षे उपेक्षित आणि दलित राहिलेला भूमिहीन शेतकरी हळूहळू जागृत होत आहे याची प्रचीती सत्तेच्या ठेकेदारांना आल्यावाचून राहणार नाही. जसजसे डाव्या पक्षांचे कार्य ग्रामीण भागात रुजायला लागेल तसतसा आतापर्यंत मुकाट्याने अन्याय सहन करीत बसलेला शेतमजूर उठावाच्या विचाराने पेटून उठणार नाही अशी जर कोणी आपल्या मनाशी खूणगाठ बांधत असेल तर तो स्वतःची फसवणूक करीत आहे असे म्हटलें पाहिजे.

१९४७ पासून १९६७ पर्यंतच्या वीस वर्षांच्या कालखंडामध्ये ग्रामीण भागातील उपेक्षित जनतेकडे फारसे लक्ष दिले गेले नाही याचा पहिला उद्रेक नक्षलबारीच्या परिसरात पहायला मिळाला. तेव्हापासून प्रस्थापित राज्यसत्तेविरुद्ध भूमिहीन शेत-मजुराला जागे करण्याचा पद्धतशीर प्रयत्न सुरू झालेला आहे. या प्रयत्नाने अद्याप म्हणावे तसे रौद्र स्वरूप धारण केलेली नाही ही गोष्ट खरी असली तरी तसे होणारच नाही असे मानणे निखालस चुकीचे ठरणार आहे. या अशा असंतुष्ट ग्रामीण भागातूनच शहरांना वेढा घालण्याची कल्पना पुढे येते आणि मग राजकारणाचे सारेच चित्र बदलून जाते. या बदललेल्या परिस्थितीत कशाकशाचा बळी पडतो हे सांगणेही फारसे अवघड ठरत नाही. आज हा धोका तसा गंभीर नाही याविषयी दुमत होण्याचे कारण नाही. पण हा वणवा उद्या भडकू नये असे जर वाटत असेल तर त्यासाठी आतापासूनच प्रयत्न करायला हवेत.

जमीन-धारणेच्या प्रश्नाकडे तातडीने लक्ष दिले गेले पाहिजे ते त्यासाठीच.

— सदाशिव पेठकर



# ती शिवणकाम शिकण्यापूर्वीच...

## तिने बचत करायला सुरवात केली

तिने किती बचत केली याला महत्त्व नाहीं पण बचतीची तिने संवय केली, या गोष्टीला महत्त्व आहे. तुम्ही तुमच्या मुलांना आतापर्यंत बचत करायला शिकविले आहे ? त्यांच्यासाठी स्टेट बँकेत एक सेव्हिंग्ज अकाउंट उघडा. बचतीची केव्हाही सुरवात करायला हरकत नाही.

**सेवेसाठीं स्टेट बँक**

Aiyars. S. 101 MR

केरळ

# लोकमताचे वारे – डाव्यांच्याही थोडे उजवीकडे

केरळातील निवडणुकीच्या निकालाचा मानदंड धरून १९७२ च्या निवडणुकांचे चित्र उभे करण्याचा प्रयत्न केला तर नव्या काँग्रेसने विजयोत्सवाची तयारी आतापासूनच करायला हरकत नाही. ७२ मध्ये निवडणुका कशा लढविल्या जातील यासाठी केरळातील या निवडणुकांचे उदाहरण डोळ्यासमोर ठेवावयास काहीच हरकत नाही. पण निवडणुकातील निष्पन्न काय होणार हे आताच ताडण्यासाठी केरळाचा निकष लावणे धोक्याचे मानले जाते. केरळ हा वेगळा देशच आहे.

काहीही असले तरी या निवडणुकीमध्ये नव्या काँग्रेसने आश्चर्यकारक प्रगती दाखविली आहे. मागच्या विधानसभेत नव्या काँग्रेसचे केवळ सहा सदस्य होते. सहा-वरून बत्तीसवर ही लहान–सहान उडी नव्हे. अर्थात नव्या काँग्रेसच्या या भरघोस यशाला निवडणूकपूर्व समझोते मोठ्या प्रमाणावर कारणीभूत झाले आहेत. उजवे कम्युनिस्ट आणि मुस्लीम लीग यांच्या पाठिंब्यामुळेच नवी काँग्रेस एवढी उडी मारू शकली. कम्युनिस्टांच्या पाठिंब्याचे शुक्लकाष्ठ नव्या काँग्रेसने आपल्यामागे लावून घेतले आहे. केंद्र सरकार कम्युनिस्टांच्या कुबड्यांवर उभे आहे. बाहत्तरनंतरदेखील ते तसेच राहणार काय ? केरळाच्या निवडणुकीत कम्युनिस्टांशी निवडणूकपूर्व सम-झोता करणार नाही असे नव्या काँग्रेसचे अध्यक्ष बाबू जगजीवनराम यांनी जाहीर केले होते, पण अलिखित समझोता झालाच. अखिल भारतीय पातळीवर तेच झाले तर नव्या काँग्रेसमधील एका मोठ्या गटाचा मोठा विरोध होईल यात शंका नाही.

केवळ कम्युनिस्टांच्या पाठिंब्यावरच नव्या काँग्रेसने ही घोडदौड केली असे म्हणविणेही अप्रामाणिकपणाचे होईल. इंदिरा गांधींची लोकप्रियता वाढती आहे. आणि नव्या काँग्रेसने घेतलेले बँकांचे राष्ट्रीयीकरण आणि नरेशांची तनखेबंदी यासारखे निर्णय केरळात लोकप्रिय होणार नाहीत तर आणखी कुठे ? नव्या काँग्रेसच्या या धाडसी निर्णयांनाही थोडेफार गुण द्यायलाच हवेत. उजव्या कम्यु-निस्टांनी केरळात नव्या काँग्रेसच्या पुनरुज्जीवनास हातभार लावला असा आरोप डावे कम्युनिस्ट करतात. हा आरोप नव्या काँग्रेसने अभिनंदनपर मिरवायला हरकत नाही.

केरळात मार्क्सिस्टांच्या मतामध्ये फारसा खड्डा पडला नाही. पण मागच्या वेळी १९६७ मध्ये काँग्रेसविरोधी आघाडीचा फायदा मिळून डाव्या कम्युनिस्टांचे बेचाळीस उमेदवार निवडून आले होते. त्यावेळी त्यांना मिळालेल्या मतात जरी

फारसा फरक पडला नसला तरी हातमिळवणीच्या जोडचा बदलल्या असल्याने त्यांचे उमेदवार कमी निवडून आले.

जुनी काँग्रेस, स्वतंत्र आणि जनसंघ यांची या निवडणुकात जी वाताहत झाली त्याबद्दल त्या पक्षांना लाज वाटण्याचे काही कारण नाही. कारण केरळ हा त्यांचा देशच नाही

पण या निवणुकांतून एक सिद्ध झाले, केरळातील लोकमताचे वारे अगदीच डाव्या बाजूला झुकत नाही. ते डाव्यांच्याही थोडचा उजव्या बाजूला वाहते. आणि केरळ उजवा कधीच नव्हता.

केरळात मुस्लीम लीगचे अकरा उमेदवार निवडून आले. केरळी आकाशात या चांद-ताऱ्याचे एवढ्या मोठ्या प्रमाणावरील अवतरण होण्यासही अर्थातच कम्यु-निस्ट-डावे, उजवे दोघेही – आणि नवी काँग्रेस यांचा प्रेमळपणाच सहाय्यभूत झाला आहे. नंबुद्रीपादांनी आपल्या राजवटीत मुस्लीमांना मोठ्या प्रेमाने मल्लपुरम् जिल्ह्याचे दान केले. मुस्लीम बहुसंख्य असलेल्या या प्रदेशात आता एक छोटा पाकीस्तानच निर्माण झाला आहे. साहजिकच तेथून मोठ्या प्रमाणावर मुस्लीम लीगचे उमेदवार निवडून आले आहेत.


कुणीतरी एकाने म्हटले आहे की, भारतात तुम्हाला डावे आणि पुरोगामी व्हायचे असेल तर मार्क्स वगैरे वाचण्याची काही गरज नाही. तुम्ही मुस्लीमांचे प्रेमळ भक्त बना आणि हिंदूंचे कट्टर शत्रू व्हा. कोणत्याही वादामध्ये मुसलमानांची अंधपणे, हिरीरीने बाजू घ्या. म्हणजे झालात तुम्ही डावे.

आज डावे-उजवे कम्युनिस्ट आणि नवी काँग्रेस हेच धोरण पुढे चालविताहेत. म्हणूनच इंदिराबाईंना जनसंघाचा जातीयवाद तेवढा खुपतो. कारण त्यांच्या म्हणण्याप्रमाणे मुस्लीम लीग जातीयवादी असेल, पण त्या पक्षाचा केंद्रसरकारला पाठिंबा आहे ना ? झाले तर मग.

पण एक मात्र खरे. या निवडणुकीने कमीत कमी एका आघाडीला तरी पुरेशा बहुमताने निवडून दिले आहे. कोणतीही एक निवडणूक-पूर्व आघाडी बहुमतात न येते तर पुन्हा आयाराम गयारामचे खेळ सुरू होऊन केरळाला अस्थिरतेने ग्रासले असते. आताही स्थिरतेची शंभर टक्के खात्री नाही. नवी काँग्रेस सरकार बनविण्यास किंबहुना सरकारात सहभागी होण्यास आता तरी नाही म्हणते आहे. परंतु १९७२ पर्यंत तरी हा आघाडीचा समझोता टिकायला काही हरकत नाही.

तिकडे उत्तर प्रदेशात चरण-सरकार पाडण्याचे नव्या काँग्रेसचे प्रयत्न आता निकराला आले आहेत, तर हे प्रयत्न हाणून पाडण्यासाठी आणि नवी युती त्या राज्यात बनविण्यासाठी जुण्या काँग्रेसचे मोरारजी देसाई लखनौला निघाले आहेत. भा. क्रां. द. मधील आणि इतर पक्षातील आमदार फुटून नव्या काँग्रेसला मिळत आहेत. येत्या पंधरवडचात हे सरकार टिकते की कोसळते याचा निकाल लागेल.

– अरुण गोसावी



# स्मारकांसमोर..

सौ. निर्मला पुरंदरे

परवा दि. १५ ऑगस्टचा व काल २६ ऑगस्टचा अंक मिळाला. दोन्हीही अंक छानच निघालेत. विशेषतः सु. ल. सोमण, दिवाकर आगाशे व अनिल बर्वे यांचे लेख मन अस्वस्थ करणारे आहेत. ही मोठमोठाली दुखणी किती खोलवर रुजलेली आहेत या विचारानं मन अस्वस्थ झालं. गोदाराणीच्या पुस्तकाबावतही खूप उत्सुकता आहे. ते न वाचताही त्याच्या अंतरंगाची कल्पना येऊ शकते. अनिक बर्वे यांच्या लेखातीलच अनुभव, दुसऱ्या प्रांतातला हा फरक फक्त. अफाट दुखणी आणि अपुरे प्रयत्न.


काल श्री. पु. लं. चे पत्र मिळालं. तेही म्हणतात, 'कलकत्त्याला गेलो होतो. समाजातील अराजक पाहून छाती दबली. पण टागोरांच्या काव्यात म्हटल्याप्रमाणे 'पणती'चं काम करणं संवेदनाशील माणसाला शक्य आहे, ते करावं हा या मानसिक दुःखाला उपाय.' अंधांच्या संस्थांना पुस्तक छापून देण्याचं त्यांचं काम सध्या चाललंय.

श्री. रतनलाल भंडारींच्या लेखावरून कार्यक्रमाची कल्पना आली. हे सर्व अंक व त्यातील ही माहिती, आगाशे यांची डायरी मला फारच उपयोगी पडली. काल Ovest-France या दैनिकाचा वार्ताहर मुलाखत घ्यायला आला होता. गल्या चार महिन्यातल्या सांघिक कामाच्या आराखड्यावरून बोलणं मला सोपं गेलं. त्यामुळे या वृत्तपत्राचा खप साडेसात लाख आहे.

सध्या मी एका खेड्यात आहे. रोज काही ग्रुप्समध्ये बोलणं होतं. शेतकऱ्यांच्या घरी जेवायला जाते. तेव्हा स्लाईड्स् फोटोंच्या सहाय्यानं भारताबद्दलची माहिती सांगण्याचा कार्यक्रम होतो. शेतकीत विज्ञान व यांत्रिक ज्ञान जवळ जवळ सर्वत्र पोहचलं आहे हे आपण तिकडेही वाचतोच. परंतु काही ठिकाणी अद्यापही हातांनी गायींच्या धारा काढल्या जातात. गोठे जुन्या पद्धतीवर आहेत. परंतु झपाट्याने

यांत्रिकीकरण होतच आहे. येथील खेड्यातला पोस्टमनही स्कूटरेटवरून पत्रं वाटतो. पण हे सर्व या देशाच्या लांबी रुंदीच्या मानानं झालंय, होतंय. माणूसबळ अतिशय महाग. घरगडी, आजी वगैरे ठेवणं परवडत नाही. खूप कामं करतात नवरा–बायको प्रत्येक घरातच. सुटीच्या १।२ महिन्यातच घर दुरुस्ती, रंग लावणे, बागेतील सुधारणा वगैरेही हीच मंडळी करतात. मुलांच्या मदतीनं.

दि. २७–८ ला येथून १०० किलोमीटर्सवर असलेलं Mont St. Michel नावाचं एक प्रसिद्ध चर्च पाहायला गेलो होतो. ब्रिटनी व नॉर्मंडीच्या हद्दीवर आहे. त्यामुळे बेळगाव–कारवारसारखा या चर्चबद्दल वाद. ब्रिटनी हा भाग म्हणतो हे चर्च आमच्या हद्दीत व नॉर्मंडी (माँश) विभाग म्हणतो खरं म्हणजे ते चर्च आमच्याच हद्दीत. जगभरचे प्रवासी या चर्चला भेट द्यायला येतात. अटलांटिकच्या लाटा पुनवे–अवसेच्या भरतीनं या चर्चच्या पायथ्याशी घुसळण घालतात. खडकावर १३ व्या शतकापासून बांधायला सुरुवात झाली. कैद्यांकडून काम करवून घेण्यात आलं. या चर्चकडे जाताना वाटेत २।३ लहानलहान शहरं, कुठे जुनेपणाचा किंचित-साही ओरखडा न दिसणारी अशी आखून रेखून नवीन वसलेली दिसली. दुसऱ्या महायुद्धात संपूर्ण बेचिराख झालेल्या वास्तू, संपूर्ण शहरं आता जणू काही झालंच नाही अशा थाटात उभी आहेत. जर्मनांनी ज्या ज्या भागातून प्रवेश केला त्यात हाही विभाग प्रामुख्यानंच होरपळला गेला. कानिटकरांची आठवण न येणं अशक्य

होतं. मी अल्बेर व सोलाँजना सांगितलं – म्हटलं आमच्या अंकात हे वर्णन मी वाचलंय.

ते चर्च पाहून परतताना जर्मन वीरांचं स्मारक पहायला गेलो. फ्रेंच सरकारनं जमीन दिलीय. या जागेत १२००० जर्मन अधिकारी–सैनिक चिरविश्रांती घेताहेत. नावा–हुद्यांच्या पाटया आहेत. नातलगांनी वाहिलेली फुलं त्या पाटयावर सुकलीत. आम्ही गेलो त्यावेळेस तेथे जर्मन बस आली होती. बहुतेक सर्व वृद्ध जोडपी होती. स्मारकाच्या इमारतीतील एका खोलीत एक वृद्ध जोडपं एका पाटीसमोर स्टुलावर मूकपणे बसलं होतं. जग तिसऱ्या महायुद्धाची तयारी करण्यात गुंतलं आहे, लक्षावधींच्या मनावर झालेली जखम अजून बरी झाली नाही, त्यांच्या प्रिय व्यक्तींनी सांडलेलं रक्त अजून सुकलंही नाही एवढयातच. येथील वातावरण शांत–गंभीर. खिन्नही होतं. संपूर्ण बसभर मंडळी फुलांचे हार घेऊन १०।१५ वर्षांपूर्वीच्या या सामुदायिक मानवसंहाराचं दर्शन घ्यायला आली होती का? या वृद्धांचे रुपेरी केस कदाचित अजून १५।२० वर्षांनी उशीरा या रंगाला आले असते. काय सृष्टिनियम तरी? शतकानुशतकं माणसं हेच म्हणत आलीत. तीच चढाईची भाषणं, तीच संरक्षणाची भाषणं, तीच स्वातंत्र्याच्या गर्जनांची चढाओढ, तेच अश्रू – तेच रक्त, कुणी दोन बोटं उंचावून V for Victory म्हणेल तर कुणी तुम्ही मला रक्त द्या – मी तुम्हाला स्वातंत्र्य देतो या वेगवेगळया शैलीत आवाहनं करतील. तोच विनाश, तेच उत्थापन आणि या स्मारकाच्या पत्रिकेत लिहीलंय, 'Peace in the world' आहे की नाही मजा? येथील स्वाक्षरी पुस्तकात मी तुमची सर्वांची आठवण करून सही करून ठेवलीय. तुम्ही आलात की पुढे तुमच्याही करून ठेवाल. कोणाच्या तरी शहाण्या–वेडया हट्टासाठी बळी गेलेली निरपराध माणसं. त्यांना वाहिलेली ही श्रद्धांजली म्हणायची.

येथून अमेरिकन सैनिकांचं स्मारक, श्रीमंती स्मारक पहायला गेलो. अमेरिकन सरकारला या स्मारकासाठी फ्रेंच जनतेनं ही जागा देणगी म्हणून दिलीय. प्रशस्त प्रांगणात ओळीनं, अर्धवर्तुळाकार ६ हजार अमेरिकन सैनिक – अधिकाऱ्यांची येथे अखेरची झोप चाललीय. सुंदर बगीचा, प्रार्थनेसाठी इमारत, संगमरवरावरील नावं, अमेरिकन सैनिकांच्या कुटुंबियांना, स्मारक पहायला येतील तेव्हा रहायची सोय आणि ते सैनिकांचे ६,००० संगमरवरी Cross. दौलतीचा दिमाख येथेही.

सर्वसामान्य माणसाला आता धसका बसलाय युद्धाचा. मुलांना कॉलेजमध्ये लष्करी शिक्षण एक वर्षासाठी सक्तीचं आहे. जीवावर येऊन करतात. काळाचे पाय पोटात घेऊन पुढे चाललेच आहेत.

[ फ्रान्सहून पाठविलेल्या पत्रातील काही भाग.
मुक्काम BRECE, दिनांक २९ ऑगस्ट ७० ]

□ □ □

पदवीदान समारंभाचा दिवस. आपला मुलगा आज पदवीधर होणार. मंजू अतिशय आनंदात आहे. आपल्या मुलांनी शिकावे व त्यांचा मानसन्मान वाढावा असें सर्वच मातांना वाटत असतें.

परंतु मुले बरीच असल्यास सर्व मातापित्यांना आपल्या मुलांना अशी संधी देता येत नाही.

तुम्हीही तुमचे कुटुंब २ किंवा ३ मुलांपुरतेंच मर्यादित ठेवल्यास त्यांना चांगले शिक्षण देऊ शकाल.

कुटुंब नियोजनासाठी सोयी सल्ला आणि इतर जवळच्या कुटुंब कल्याण नियोजन केंद्रात मिळतात. ही केंद्रे लाल त्रिकोणाच्या खुणेने ओळखता येतात.

चांगल्या शिक्षणासाठी कुटुंब नियोजन

# सोनियाचा दिवस



# गेल्या मार्चमध्ये मी केरळच्या दौऱ्यावर होतो....

विजय वैद्य

शुक्रवार दिनांक १८ रोजी बोरीबंदरकडून मी मुंबई विद्यापीठाकडे चाललो होतो या दादाभाई नौरोजी रोडचे दोन्ही फुटपाथ म्हणजे फेरीवाल्यांच्या अड्डा. विषेशतः फोर्टच्या रोखाने जात असता आपल्या डाव्या फुटपाथवर त्यांची संख्या अधिक व या फेरीवाल्यातही विशेष नजरेत भरणारी मंडळी असतात केरळीय. भर रस्त्यावर अगदी खुल्लम खुल्ला आपल्याला त्यांच्याकडे चोरटी आयात केलेल्या अनेक वस्तू मिळतात. कधी कधी कस्टमची त्यांच्यावर धाड पडते. चेहऱ्याकडे पाहून ही मंडळी काही शिकलेली असतील असं वाटत नाही, पण काही म्हणा, केरळचा माणूस फारच जागृत बुवा. परवा म्हणजे शुक्रवारी ही मंडळी ट्रान्झिस्टर्स लावून अगदी कानात जीव ओतून केरळ निवडणुकींचे निकाल ऐकत असल्याचं दृश्य दिसत होतं. इतरांच्या सोयीसाठी छोट्या फळ्यांवर पटापट निकाल लिहिले जात होते. जाणारी येणारी अनेक मंडळी तेथे निकाल पहायला थांबत होती.

केरळपासून अनेक मैल कितीही दूर असला तरी केरळीय माणूस नेहमीच देशातील, परदेशातील व त्याच्या राज्यातील घडामोडींबद्दल खूप खूप आस्था दाखवितो असा माझा अनुभव आहे. शिक्षितांचे केरळातील प्रमाण देशात सर्वात अधिक (त्रावणकोर–कोचीनचे राजे व ख्रिश्चन मिशनरी यांना याचं केरळमध्ये श्रेय देण्यात येतं) व बेकारीचेही. शिक्षणाचा परिणाम व बेकारीमुळे त्रस्त झालेला केरळीय डावीकडे झुकला असला तरी तो विचार करू शकतो. आंधळेपणे तो तसा कोणामागे जाणार नाही, पण जातीयवादसुद्धा केरळमध्ये खूपच दिसतो. विषेशतः मुसलमान, ख्रिश्चन्स व नायर जमात यांच्यात तो चांगलाच आढळतो, अर्थातच मतदानाच्या वेळी हा मुद्दा महत्त्वाचा ठरतो.

परवाच्या निवडणुकीतही हेच दिसलं. मुस्लिम लीग व ख्रिश्चन्स आणि नायर

जमातीचं वर्चस्व असलेली केरळ काँग्रेस यांनी त्यांच्या भागात आपापली शक्ती कायम ठेवली.

काँग्रेसमधील फूट पडल्यानंतर होणारी ही पहिलीच निवडणूक म्हणून तिचं महत्त्व फार होतं (पण तसं पहाता एकसंध काँग्रेसनं मागच्या निवडणुकीत फक्त ९ जागाच मिळविल्या होत्या) कारण इंदिराबाईंची घोडदौड सध्या वेगाने चालू आहे. निवडणुका तोंडावर आल्या असता केंद्र सरकारनं तनखे बंद विधेयक आणलं. त्यामागोमाग कच्च्या रबराचे भावही वाढवून दिले. केरळमध्ये या व्यवसायात अनेक लोक आहेत आणि या गोष्टीचा फायदा काँग्रेस–भारतीय साम्यवादी पक्षाच्या छोट्या आघाडीला (मिनी फ्रन्ट) मिळण्याची खूप शक्यता होती. (भाव वाढवून द्यावे असं सर्वच पक्षांना जरी वाटलं होतं तरी मार्क्सवादी व इतर सर्वच 'छोट्या आघाडीचे' विरोधक, याचा फायदा 'छोट्या आघाडी'ला मिळावा म्हणून टाकलेला डाव असं म्हणतच होते) छोट्या आघाडीतील पक्ष, प्रचारात वरील दोन्ही निर्णयांवर भर देऊन मतदारांवर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न करीत होतेच. तीन निरनिराळ्या आघाड्यांमुळे केरळचा मतदार थोडाफार भांबावून गेला होता. 'जातीयवादी', 'साम्यवादी', 'लोकशाहीवादी' शक्ती (Forces) जोरदार प्रचारात दंग होत्या. त्यामुळे कोणाला मतं द्यावीत हा त्यांच्यापुढे प्रश्न पडला असल्यास नवल नव्हतं. दि टाइम्स ऑफ इंडियाचे व्यंगचित्रकार श्री. लक्ष्मण (हेही केरळीयच आहेत) यांनी १५ सप्टेंबरच्या अंकात 'रोड टू दि पोल्स' या शीर्षकाखाली केरळीय माणसापुढे असलेला वरील प्रश्न फारच बोलक्या रितीने उभा केला आहे. व्यंगचित्रात घनदाट जंगल दाखविलेलं असून जंगलात मार्गदर्शनात्मक निरनिराळ्या पाट्या असतात तशा पाट्या दाखवून त्यावर 'टर्न लेफ्ट', 'नो लेफ्ट टर्न', 'टर्न राईट', 'नो राईट टर्न', 'वेलकम टू डियर फॉरेस्ट', 'डेंजर, वाइल्ड बेअर टेरिटोरी' वगैरे मजकूर दाखवून त्यांचा नेहमीचाच भांबावलेला माणूस वाटचाल करीत असलेला दिसतो. केरळने जरी मतपेटीद्वारे जगातील पहिलं साम्यवादी सरकार सत्तेवर आणलं असलं तरी केरळ म्हणजे साम्यवादी हे समीकरण बरोबर नव्हे. काँग्रेसने अक्षम्य चुका केल्या होत्या. काँग्रेस बदनाम झाली होती. केरळला स्थिर आणि जनतेचं कल्याण करणारं सरकार पाहिजे होतं. ती संधी त्यांनी साम्यवाद्यांना दिली. तो पक्ष फुटल्यावर त्यांनी मार्क्सवादी साम्यवाद्यांच्या पदरात झुकत माप टाकलं पण आज त्याचं मार्क्सवाद्यांना जबर धक्काही त्याच केरळीयांनी दिला आहे. एक मात्र सत्य आहे, केरळला उजवा विचार पटेल असं दिसत नाही. परवाच्या निवडणुकीतही उजव्यांचा पार धुव्वा उडाला.

गेल्या मार्चमध्ये मी केरळच्या दौऱ्यावर होतो. केरळीय माणसाची मनोवृत्ती, त्याचे विचार, जागरुकता वगैरेंचा अनुभव त्यावेळी मी घेतला. त्यावेळी अच्युत मेनन सरकार कारभार करीत होतं. मार्क्सवादी सरकार कोसळलं होतं. त्यांनी

जनतेला वारेमाप आश्वासनं दिली होती, पण त्यापैकी प्रत्यक्षात काहीच आलं नव्हतं. मेनन सरकार धिमेपणे पण दमदारपणे काम करीत होतं. साम्यवादाचे विरोधकही प्रांजळपणे मेनन सरकारच्या कामगिरीबद्दल चांगले उद्गार काढीत होते.

मला भेटलेल्या बहुतेक सर्वांचीच मनापासून अशी इच्छा दिसली की १९७२ पर्यंत केरळात मेनन सरकार अस्तित्वात असावं. सामान्य माणसानं दाखविलेला हा सरकारवरील विश्वास होता. साम्यवाद्यांच्या अनेक विरोधकांनी मला सांगितलं की ती मंडळी साम्यवाद्यांची विरोधक असूनही स्थिर व कल्याणकारी सरकार अस्तित्वात यावं आणि बदनाम झालेली काँग्रेस पडावी म्हणून आणि केवळ याच कारणासाठी त्यांनी साम्यवाद्यांना मतं दिली.

एका अत्यंत भाविक सुशिक्षितानं सांगितलं, 'वुइ हॅड मड इन वन हॅन्ड अॅन्ड सॅन्ड इन दि आदर, यट वुइ व्होटेड कम्युनिस्टस् जस्ट टू गेट स्टेबल अॅन्ड गुड गव्हर्नमेंट.'


मात्र मेनन सरकार अस्तित्वात येताच मार्क्सवाद्यांची सद्दी संपत आली होती. लोकांच्या मनातून हा पक्ष उतरत होता. अनेकांनी मत दिलं 'मार्क्सिस्ट आर लुझींग ग्राउंड'. त्रिवेंद्रम ते कोचीन या ३५ मिनिटाच्या विमान प्रवासात माझे 'सहप्रवासी' होते माजी मुख्यमंत्री कॉं. इ. एम्. एस्. नंबुद्रीपाद. यांना मी विचारलं, आरन्ट मार्क्सिस्ट लूझिंग ग्राउंड इन केरला' त्यावर ते थोडेसे रुष्ट होऊन म्हणाले, 'हू सेज् सो, वुइ आर नॉट लूझिंग ग्राउंड, टाइम विल डिसाइड हू इज लूझिंग ग्राउंड' माझ्या इतर अनेक प्रश्नांनाही त्या मुत्सद्दी माणसानं सफाईदार बगल दिली व नंतर ते म्हणाले, 'यंग मॅन आय कॉन्ट आन्सर क्वेश्चन्स इन सच अ शॉर्ट टाइम, सो होप टू सी यू इन बॉम्बे सम टाइम', मीही तितक्याच जोरदारपणे म्हटलं, 'आय होप टू सी यू इन त्रिवेंद्रम् कॉम्रेड.' काहीही असो मार्क्सिस्ट वेअर लूझिंग ग्राउंड हे सत्य होतं.

केरळचे साम्यवादी व बंगाली साम्यवादी यातही खूप फरक आहे. २३ मार्चचीच गोष्ट पहा, त्या दिवशी मेनन सरकारनं विधानसभेत त्यांच्या सरकारवर विश्वास व्यक्त करणारा ठराव आणला होता. मी विधानसभेच्या परिसरात होतो. मार्क्सवाद्यांचे हजारो पाठीराखे तेथे जमले होते. मोठ्या तयारीत होते. ठराव फेटाळला गेला असता तर तो त्यांचा विजय ठरला असता. कोणत्याही परिस्थितीत हुल्लड माजविणे त्यांना अशक्य नव्हतं. वातावरण फारच तंग होते पण सरकारवर विश्वास व्यक्त होताच हे सर्व मार्क्सवादी अत्यंत शांतपणे पांगले. उलट बंगालात मुखर्जी सरकारनं राजिनामा देताच हिंसेची लाट उसळली. ते दृष्य पहाताच मला ठामपणे वाटलं निदान केरळात तरी लोकशाहीला धोका नाही. आजही केरळने हेच पुन्हा सिद्ध करून दाखवलं आहे.

□ □ □

श्रीक्षेत्र गोमंतक

# नायब राज्यपाल– वादळाची शक्यता



गोव्याचे नायब राज्यपाल श्री. नकुल सेन आणि मुख्यमंत्री श्री. दयानंद बांदोडकर यांच्यातील तणातणी पुनश्च वाढल्याच्या बातम्या आहेत.

गेल्या जानेवारी महिन्यात, या नायब राज्यपालांना माघारी बोलाविण्यात यावे' अशी मागणी मुख्यमंत्र्यांनी पुण्यात केली आणि त्यानंतर केंद्रीय गृहमंत्री (त्यावेळचे) श्री. यशवंतराव चव्हाण हे गोव्यात आले. त्यावेळी दोघांच्यात दिलजमाई झाल्याचे वृत्तही त्यामागोमाग बाहेर आले. माझ्या माहितीनुसार ही दिलजमाई नव्हती तर तडजोड होती आणि तीसुद्धा नायब राज्यपालांनी–तुज मी शरण अजि माफ मजला करा–या चालीवर केलेली होती. हे श्री. नकुल सेन त्यावेळी मुख्यमंत्र्यांच्या बंगल्यावर आले. दोघांच्यातही बोलणी झाली. अर्थात ती गुप्त स्वरूपाची असली तरी त्यानंतर मुख्यमंत्री राजनिवासात भोजनाला गेले यावरून येथील पत्रकार काय ते समजले. दुसऱ्या दिवशी श्री. चव्हाणांबरोबर आलेल्या एका दिल्लीच्या पत्रकाराने बातमी पाठविली–नायब राज्यपाल व मुख्यमंत्री यांच्यात दिलजमाई.

राज्यपाल व मुख्यमंत्री यांच्यात मतभेद निर्माण होण्याचा पहिला

मान पश्चिम बंगाल राज्याचा. त्याचेच लोण गोव्यात पोचले असे मानले तरी तेथील राजकीय परिस्थिती व गोव्याची यात खूपच अंतर होते. येथे घटनाविरोधी अथवा बहिष्कृत असे काहीच घडले नव्हते. परंतु तरीही मुख्यमंत्री श्री. बांदोडकर म्हणत होते, नायब राज्यपालांना केंद्राने माघारी बोलवावे.

आताही त्याचीच पुनरावृत्ती होण्याचा काळ माझ्यामते फारसा लांब नाही.

खरे तर श्री. नकुल सेन हे आहेत प्रशासक ! (अॅडमिनिस्ट्रेटर) परंतु एखाद्या घटक राज्याच्या राज्यपालाहून येथे त्यांचा शाही इतमाम ! पोर्तुगीज गव्हर्नर वापरीत असलेल्या 'काबो' राजनिवास या अलिशान वास्तूत वास्तव्य. दिमतीला सारा सरंजाम ! कॅडिलकसारखी प्रचंड परदेशी मोटारगाडी. सोबत पोलिसांचा ताफा आणि शाही इतमामाने हे 'महाराज' बाहेर पडतात. त्यावेळी रस्त्यातील रहदारी तात्पुरती बंद ठेवण्याचा एक नवीन प्रकारही हल्ली त्यांनी सुरू केलेला आहे.

परंतु असा हा प्रशासक म्हणजेच केंद्रशासित प्रदेशांचा प्रमुख ! मुख्यमंत्री नावापुरते. संघप्रदेश कायद्याने त्यांना बेसुमार अधिकार दिलेले आणि मधूनमधून त्यांचा वापर करून मुख्यमंत्र्यांच्या योजना धुळीस मिळविल्या जातात ही सचिवालयाची बातमी !

समय दोन आठवड्यांपूर्वीचा ! विधानसभेत स्वतःच्या नेतृत्वावर विश्वासाचा प्रस्ताव संमत करून घेतल्यानंतर आपल्या नव्या मंत्रिमंडळाची यादी मुख्यमंत्र्यांनी नायब राज्यपालांच्याद्वारा राष्ट्रपतींकडे पाठविली. अर्थातच या यादीत ज्यांचे सहाय्य बांदोडकरांनी घेतले त्या यु. गो. प्रागतिक गटाच्या एका आमदाराचा मंत्री म्हणून समावेश होता. ही यादी संमत होऊन येताच (-केवळ एक विधी म्हणून-) मंत्रिमंडळाचा शपथविधी ! आपल्या सहकारी मंत्र्यांची नावे मुख्यमंत्र्यांनी सुचवायची व संसदीय संकेत पाळून ती मान्य व्हायची ही परिभाषा देशात सर्वत्र चालणारी.

परंतु येथे कोठेतरी गुंतवळ झाली. ज्यांनी पाठिंबा दिला ते दुसऱ्या पक्षाचे. त्यामुळे राजनिवासातच कुठेतरी फाईल घुटमळू लागली. आणि त्याचा इष्ट तो परिपाक म्हणून नव्या मंत्रिमंडळाला विलंब ! 'संमिश्र मंत्रिमंडळ' हा शब्द नायब राज्यपालाना कदाचित आठवला नसावा असे एकजण म्हणाला.

नक्की काय घडले, गुंता का झाला याची वाच्यता करायला सचिवालय तयार नाही. परंतु कुठेतरी अस्मितेची जाणीव धगधगू लागली एवढेच समजले. मुख्यमंत्र्यांचा प्रासाद व राजनिवास यांच्यामध्ये मतभेदांची भिंत परत एकदा उभी रहाते आहे, एवढाच निष्कर्ष माझ्या संशोधनातून निघाला.

श्री. नकुल सेन हे सप्टेंबर अखेरीस आय्. सी. एस. पदावरून निवृत्त होणार आहेत. बहुतेक अशा अधिकाऱ्यांना अशा या निवृत्तीच्यावेळी म्हातारचळ होत असावा –

बांदोडकरांच्या हुकूमशाहीला आळा घालायला श्री. सेनसारखेच राज्यपाल गोव्याला हवेत.

तुम्हाला माहीत नाही ? परवाच गोवा चेंबर ऑफ कॉमर्सच्या एका समारंभात सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगधंद्यावर त्यांनी टीका केली. सरकारी धोरणाच्या विरुद्ध.

गोव्यातील नायब राज्यपालपदाची त्यांची मुदत आता संपली ना ?–

–तीन प्रतिक्रिया

सचिवालयातून एकच समजू शकले, मंत्रिमंडळ अधिकारावर येण्यास झालेला विलंब नायब राज्यपालांमुळे.

एक खरे की आता मुख्यमंत्री – नायब राज्यपाल हा तणाव तुटेपर्यंत ताणला जाणार. काही का असेना स्वातंत्र्यानंतर येथे आलेल्या राज्यपालांमध्ये कारकीर्द गाजली – मग ती – घट भिंद्यात् पटं छिंद्यात् – प्रकाराने का असेना – ती श्री. नकुल सेन यांचीच !

एवढा विरोध झाला तरी आता येथे संमिश्र मंत्रिमंडळ अटळ. (एव्हाना आलेच असेल.) त्याची पूर्वतयारी म्हणूनच की काय यु. गो. प्रागतिक गटाचे नेते व म. गो. चे बांदोडकर यांनी एकत्र, एका व्यासपीठावर येऊन एक सभा घेतली ती खूप गाजली. यु. गो. च्याच हळदोणे या मतदार संघात ! ‘जोवर या प्रदेशातील जनतेचे जीवनमान सुधारत नाही, आणि सर्व लोकांना जातिधर्मनिरपेक्ष सामाजिक व आर्थिक विकासाच्या समानसंधी उपलब्ध होत नाहीत तोवर भावनिक अशा, आणि ज्या गोष्टींशी गोमंतकीयांचा सध्यातरी संबंध नाही अशांवर शक्ती व्यर्थ खर्ची घालणे चुकीचे ठरेल.’

हे या संयुक्त सभेचे फलित.

## कला अकादमी

गोमंतकात एक ‘कला अकादमी’ आहे. इतर राज्यात आहे म्हणून येथेही ! साहित्य, नाट्य संगीत यासाठी वेगवेगळ्या अकादमी असण्यापेक्षा एवढ्या छोट्या प्रदेशात एकच ‘कला अकादमी’ ठेवा असे केंद्र सरकारने सुचविल्यानंतर नाट्य अकादमीतून ही उदयास आली.

सरकारी चौकटीचा बागुलबोवा दाखवून शासकीय नियमावर बोट ठेवून शक्यतो कलाविषयक गोष्टी बाजूला पडतील याची दक्षता–कशी व का कोण जाणे–घेण्यात आली.

गोमंतक हे तसे कलेचे माहेरघर. नाट्य, साहित्य, संगीत या तिन्ही क्षेत्रात

अनेक वीराग्रणी या भूमीने निर्माण केले. येथे खरोखर या कला अकादमीतून काही व्हायला हवे असेल तर गोव्यातही एक संस्कृती मंत्रालय शासकीय पातळीवर निर्माण करण्यात येऊन त्या ठिकाणी कलासक्त लोक नेमावयास हवेत, हे एका कलातज्ञाचे मत.

या कला अकदमीची परवाच येथे बैठक झाली. श्री. जितेंद्र अभिषेकी, श्री. दामू केंकरे, सौ. प्रफुल्ला डहाणूकर हे या अकादमीचे तीन सदस्य! संगीत, नाट्य, व चित्रकला यांचे प्रतिनिधित्व करणारे! अकादमीचे अध्यक्ष मुख्यमंत्री श्री. बांदोडकर यांच्या ऐवजी राज्यमंत्री श्री. अच्युतराव उसगांवकर यांनी बैठकीचे सूत्रचालन केले. अनेक सूचना, उपसूचना, चर्चा सारे सोपस्कार झाले. गोव्यात प्रत्यक्ष असे काही तरी कार्य व्हावे या तळमळीने ही त्रिमूर्ती मुंबईहून आपले व्याप सोडून धावली होती. सध्या तरी ते सगळे आशा बाळगून आहेत की, गोवा एक छोटासा पण आदर्श प्रदेश म्हणून कलाक्षेत्रात मिरवेल!

याच दरम्यान सध्या एक वादंग येथे चालू आहे.

पोर्तुगीज काळात 'अकादमीय द म्युझिक' नावाची पाश्चिमात्य संगीताचे शिक्षण देणारी एक संस्था येथे होती. स्वातंत्र्यानंतर सालिना साठ हजार रुपयांचा तनखा अनुदानाच्या रूपाने या संस्थेला मिळत होता. परंतु तो हळू हळू कमी करून सरकारने 'तीस हजार रुपये वार्षिक'वर आणला आहे. त्यावर खूप टीका झाली. चालू आहे.

सरकारचे म्हणणे : या संस्थेत संगीत शिक्षणाऐवजी इतर गोष्टी चालू झाल्या. एवढ्या पैशांचा विनियोग व्हावा एवढ्या प्रतीचे – एवढ्या लोकांना शिक्षण तिथे दिले जात नाही. आम्ही सध्याच्या कला अकादमीमार्फत पाश्चिमात्य संगीत शिक्षण देण्याचा विचार करू.

त्या लोकांचे म्हणणे : आमचे वेगळेपण कायम ठेवा. आमची 'अकादमीय द म्युझिक' जिवंत ठेवा. आम्हाला अनुदान द्या! नपेक्षा येथून पाश्चिमात्य संगीत नाहीसे होईल.

याबाबत बोलताना संगीतज्ञ श्री. जितेन्द्र अभिषेकी म्हणाले : पाश्चिमात्य संगीताचे जतन प्राणपणाने हवे. ते होईल ते करावे. परदेशातसुद्धा बऱ्याच ऑर्केस्ट्रामधून फर्स्ट फिडलिस्ट गोमंतकीय असतो हे विसरून चालणार नाही.

मुख्यमंत्री बांदोडकरांचे म्हणणे : आम्हाला पाश्चिमात्य संगीत इथे वाढवायचे आहे!

माझ्यासारख्या 'शास्त्रकलाविहीन' माणसाने या गोष्टीवर भाष्य का करावे?

– विनायक बार्देशकार



लैला खलीद

बारा सप्टेंबरच्या रविवारी दुपारी [अॅम्स्टरडॅमच्या विमान-तळावरून न्यूयॉर्कला जाणारे फ्लाईट नं. २१५ हे विमान सुटले, तेव्हा एल् अल् कंपनीच्या अधिकाऱ्यांना वाटलं, हवाई चाचेगिरीचा एक प्रयत्न आपण हाणून पाडला! पण त्यांचा अंदाज चुकला होता. फ्लाईट नं. २१५ वाचले खरे, पण त्या-ऐवजी दुसरेच विमान चाच्यांनी हस्तगत केले होते.]

एल् अलच्या अधिकाऱ्यांना त्या दोघा कृष्णवर्णीयांचा संशय आला होता. त्यांच्याकडे सेनेगलिज् पासपोर्ट होते. अधिकाऱ्यांना संशय आला तो या दोघांनी तिकीट मागितले तेव्हा.

# मध्यपूर्वेतील हवाई दहशतवाद

किरण ठाकूर

---

दोघांनी न्यूयॉर्कचे व सँटियागाचे पहिल्या दर्जाचे तिकीट मागितले, तेव्हा एजंट चमकला. कारण एका तिकिटाची किंमत असते आठशे डॉलर्स !

पण केवळ एवढया कारणावरून इच पोलिसांकडे संशय व्यक्त करावा, असे एल् अल्ना वाटले नाही. त्याऐवजी त्यांनी आपल्या डिटेक्टिव्हांनाच चौकशी करायला सांगितले. या डिटेक्टव्हांनाही काही संशयास्पद आढळले नाही.

तरी सुद्धा धोका पत्करण्याऐवजी एल् अल् अधिकाऱ्यांनी शनिवारी या दोघा कृष्णवर्णीयांना 'सॉरी, नजर चुकीने तिकीट दिलं खरं, पण अजिबात जागा नाही.' असे फोनवरून सांगून टाकले.

मग या जोडीने दुसऱ्या विमानांची चौकशी केली. दुसऱ्या दिवशी रविवारी, एल् अल् विमानानंतर पंधराच मिनिटांनी पॅन अॅमचे जम्बो जेट न्यूयॉर्कला जाणार होते. या अजस्त्र विमानात भरपूर जागा होती.

एल् अल्ने कौशल्याने टाळलेले दुर्दैव पॅन अॅमच्या नशिबात होते—! अरब गनिमांच्या जाळ्यात मोठे घबाड सापडले होते. कोटयावधी रुपयांची ही वस्तू अरब गनीम कैरो विमानतळावर क्षणार्धात उडवून देणार होते—

—त्याच दिवशी सकाळी ११–०५ ला आणखी एक जोडी फ्रँकफर्टहून अॅम्स्टरडॅमकडे लुफ्थान्सा फ्लाईट नं. २८७ ने निघाली होती. पण हे दोघे पुरुष नव्हते तर त्यांच्यात एक देखणी तरुणी होती. दोघांनी आपली नावे डियाझ व चावेझ अशी सांगितली. पण प्रत्यक्षात त्या तरुणीचे नाव लैला खलीद

होते. या दोघांजवळ होंडुरन पासपोर्ट होते.

एल् अल्च्या अधिकाऱ्यांना त्या दोघा कृष्णवर्णीयांचा संशय आला नसता तर फ्लाईट नं. २१५ मध्ये हे असे चौघे जाणार होते. लैला व तिचा साथीदार ॲम्स्टरडॅमला येऊन मिळणार होते.

एल् अल्ची सुरक्षा व्यवस्था मजबूत असल्याची प्रसिद्धी असल्याने कदाचित 'एक से दो भले, दो से भले चार' या कल्पनेने ही चौकडी एकत्र येणार होती. पण त्यांची योजना थोडी बारगळली. दोघांना आधीच पॅन ॲमच्या जंबो जेटने निघून जावे लागले.

लुफ्थान्सा फ्लाईट ॲम्स्टरडॅमला वेळेवर आली. लैला व तिच्या साथीदाराने १-१५ च्या विमानाचे तिकीट आधीच 'बुक' केले होते. एक तासभर वाट पहायची होती.

आश्चर्य असे की त्या कृष्णवर्णीय दुक्कलीचा संशय घेणाऱ्या एल् अल्च्या अधिकाऱ्यांना लैलाचा मात्र जराही संशय आला नाही. वास्तविक गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये 'टी डब्ल्यू एचे जेट रोमहून दमास्कसला पळवून लावण्यात भाग घेतलेली तरुणी' म्हणून लैलाचा फोटो सर्वत्र पाठविण्यात आला होता.

या अधिकाऱ्यांनी लैलाचे सामान तपासले नाही, चौकशी केली नाही. पण याहीपेक्षा ॲम्स्टरडॅमच्या पोलिसांनी केलेला हलगर्जीपणा अधिक अक्षम्य होता.

इंटरनॅशल पोलीस ऑर्गनायझेशनने काही दिवसांपूर्वीच सर्व युरोपच्या पोलिसांना गुप्त इशारा दिला होता :–मध्यपूर्वेतून हवाई चाचे युरोपात आले आहेत !

पॅरिसच्या मुख्य कचेरीत इंटर पोलच्या बैरुट शाखेने आणखीनच अचूक संदेश पाठविला होता :–पॅलेस्टाईनचे गनिम इलेक्ट्रानिक शस्त्रे घेऊन चाचेगिरीस निघाले आहेत. ॲम्स्टरडॅम विमानतळावर लक्ष ठेवा !

हा संदेश वॉशिंग्टनच्या एफ्. बी. आय्. कडे, लंडन, डच, जर्मन व फ्रेंच पोलिसांकडे पाठविण्यात आला होता. पण कोणत्याच विमानतळावर जास्त खबरदारी घेतलेली दिसली नाही.

एल् अल्चे बोईंग ७०७, फ्लाईट नं २१९ विमान ॲम्स्टरडॅमहून वेळापत्रकाअगोदर आठ मिनिटे निघाले. अटलांटिक सागरावरून जाताना उलटच्या दिशेने येणाऱ्या वाऱ्यामुळे उशीर होण्याची शक्यता होती म्हणून उड्डाण आठ मिनिटे अगोदर.

लैला व तिचा साथीदार तिसऱ्या वर्गाची तिकिटे काढून बसले होते.

टूरिस्ट कंपार्टमेंटच्या तोंडाशीच लैलाला जागा मिळाली होती. तिचा साथीदार तिच्या जवळच्याच खुर्चीत होता.

अडतीस मिनिटांनी विमान वीस हजार फूट उंचीवर आले होते. तिचा साथीदार अचानक फर्स्टक्लास कंपार्टमेंटकडे धावला–येथनच पुढे कॉकपिटचे दार !

यानंतर काय घडले हे समजण्यासाठी एल् अल्ची चाचेगिरी प्रतिबंधक व्यवस्था माहिती करून घेतली पाहिजे.

एल् अल्चा नियम पहिला: फ्लाईट डेक व पॅसेंजर केबिन यांच्यामधील दार नेहमी बंद ठेवायचे, नुसत्या ठोठावण्याने ते कधीही उघडू नये.

त्यामुळेच कॅप्टन बार लेव याला विमानात गडबड आहे याची जाणीव झाली. लैलाच्या साथीदाराने दार ठोठावले तेव्हा कॅप्टनने आपल्या इंजिनिअरला 'पीप होल' मधून डोकावून पहायला सांगितले.

---

## अरब गनिमांच्या संघटना

### पॅलेस्टाईन लिबरेशन ऑर्गनायझेशन

पॅलेस्टाईन नॅशनल रेझिस्टन्स मुव्हमेंटची अधिकृत संघटना. अरब लीग व अरब सरकारांकडून या संघटनेला थोडेफार आर्थिक सहाय्य मिळते. मुख्य उद्देश: पॅलेस्टाईनमध्ये नॅशनल कौन्सिल स्थापन करणे. यात दोन लष्करी विभाग–(अ) पॅलेस्टाईन लिबरेशन आर्मी–बळ ८०००, स्थापना १९६७ पूर्वी. सध्या बहुश: सिरियात. पॅलेस्टाईन आर्म्ड स्ट्रगल कमांड निर-निराळ्या अरब गनिमांच्या लष्करी हालचालीचे एकसूत्रीकरण करते.

अल फताह: (पॅलेस्टाईन लिबरेशन मुव्हमेंट): गनिमांची सर्वात मोठी संघटना. बळ: सुमारे ८००० ते १५०००. नेतृत्व: पॅलेस्टाईन लिबरेशन ऑर्गनायझेशनचे अध्यक्ष यासर अराफत यांच्याकडे.

पॉप्युलर फ्रंट फॉर दि लिबरेशन ऑफ पॅलेस्टाईन: बळ: १०००–३०००, नेतृत्व: रिव्होल्युशनरी मार्क्सिस्ट व पॅन–अरेबिस्ट जॉर्ज हबाश. अल फताहल हवाई चाचेगिरी, पश्चिमेविरुद्ध दहशतवाद मान्य नाही, तर या संघटनेला ते पूर्ण मान्य आहे.

पॅलेस्टाईन डेमोक्रॅटिक फ्रंट: बळ २००–३००, नेतृत्व: माओवादी प्रवृत्तीचा मार्क्सिस्ट, नेफ हवात महे. जॉर्डन व इतर व्याप्त प्रदेशातील पॅलेस्टाईनींमध्ये राजकीय व्यवहार करण्याकडे कल.

सैका: (अर्थ: वीज) बळ: ५००–१०००. हे लोक सिरियन बाथ (पॅन अरब सोशॅलिस्ट) पार्टीचे आहेत. सिरियन सरकारचा पाठिंबा.

याशिवाय (१) फ्रंट मधून फुटलेली 'जनरल कमांड' ही डावी संघटना, ॲक्शन ऑर्गनायझेशन फॉर लिबरेशन ऑफ पॅलेस्टाईन, पॅलेस्टाईन पॉप्युलर स्ट्रगल फ्रंट, अरब लिबरेशन फ्रंट, असे छोटे गट आहेत. सर्वांचे ध्येय त्यांच्या नावातच स्पष्ट होते.

---

नियम दुसरा : गडबड आहे असे वाटले की लगेच विमान कमी उंचीवर न्यायचे. त्यामुळे डोकावून पहाण्याआधीच फ्लाईट इंजिनिअरने इमर्जन्सी ड्राईव्हची तयारी केली.

नंतर पीप होलमधून पाहिले तो खरोखरच 'गडबड' उडाली होती !

विमान लगेच कमी उंचीवर आणून मगच कॅप्टन आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीसाठी केबिनमध्ये धावला.

केबिनमध्ये बरीच धावपळ झाली होती. लैलाचा साथीदार – बराचसा गोरा, अरबासारखा न दिसणारा दार उघडण्याचा प्रयत्न करू लागला तेव्हा स्टुअर्डने त्याच्या अंगावर झेप घेतली. गनिमाने गोळ्या झाडल्या त्यात हा स्टुअर्ड जखमी झाला. एवढ्यात विमानाचे रक्षक आले. त्यांनी गोळ्या झाडून गनिमाला जखमी केले. नंतर तो लंडनच्या दवाखान्यात मरण पावला.

एव्हाना लैलादेखील उठली होती. आपल्या साथीदाराप्रमाणेच गुरासारखी ओरडत तीदेखील पुढे सरकली. तिच्या दोन्ही हातात ग्रेनेड होते. कोणीतरी तिला अडकवून पाडले. हातातील एक ग्रेनेड उडून खाली पडला. त्याची पीनही निघालेली होती. केव्हाही स्फोट होण्याची शक्यता होती. पण तसे झाले नाही. विमान सुरक्षित उतरल्यानंतरही स्फोट झाला नाही.

झाला असता तर ?

एल अल् अधिकारी म्हणतात : फारसे बिघडले नसते. छोटेसे भोक पडले असते. पण विमान कमी उंचीवर असल्याने अनर्थ झाला नसता.

पण इतर विमान कंपन्यांचे मत उलटेच आहे. सबंध विमानाचा स्फोट नसता झाला हे खरे. पण विमानातील महत्त्वाची यंत्रे नादुरुस्त झाली असती. प्रवासी जखमी झाले असते, हें वेगळेच.

स्फोट का झाला नाही ?

एक शक्यता आहे. या ग्रेनेडमध्ये फ्यूजची लांबी आवश्यकतेपेक्षा कमी असावी. म्हणून सेफ्टी पीन काढूनसुद्धा 'उपयोग' झाला नाही.

सर्वच ग्रेनेड असे असले तर त्यांचा धाक दाखवून या व इतर विमानात गनिमांनी सर्वांनाच बनविले म्हणायचे !

क्लॅक्टनवरच्या आकाशात हा सर्व प्रकार चालू असतानाच आणखी एक नाट्य सुरू झाले होते. रंगमंच : पुन: ॲम्स्टरडॅम !

ब्रुसेल्सहून आलेल्या पॅन ॲमचे जंबो जेटचे १५१ प्रवासी विमानतळावर विमानाची वाट पहात होते. विमान न्यूयॉर्कला दुपारी १–३० निघणार होते.

आपण टाळलेले ते कृष्णवर्णीय प्रवासी जंबो जेटने जाणार असल्याचे एल् अल्च्या लक्षात येताच त्यांनी पॅन ॲमच्या कंट्रोल टॉवरला कळविले. टॉवरने

कॉकपिटमधील कॅप्टन प्रिडीला संदेश दिला.

पण वेळ निघून गेली होती. प्रवासी जंबोमध्ये जाऊन बसले होते. विमान निघण्याची वेळ झाली होती.

तीन वाजून दहा मिनिटे झाली होती. म्हणजे ठरलेल्या वेळेपेक्षा एक तास चाळीस मिनिटे उशीरच.

तरीसुद्धा कॅप्टन प्रिडीने आणखी उशीर करण्याची तयारी दाखविली. त्याने त्या दोघा 'सेनेगलिझ' कृष्णवर्णीयांची तपासणी करायला आपल्या सहकाऱ्यांना सांगितले.

त्या जोडीने तयारी दाखविली. पण स्टुअर्डस् बॅगा तपासू लागले तेव्हा मात्र आपले 'राजनैतिक पासपोर्ट' दाखविले. राजकारणाचे लचांड नको म्हणून मग कॅप्टननेही आवरते घेतले.

त्याच वेळी त्याने आग्रह धरला असता तर ?

तीन बावीस झाले होते. जंबो विमानतळापासून जरासेही दूर गेले नव्हते. एक गनीम उठला, जिन्याने फर्स्ट क्लास लाउंजमध्ये व नंतर कॉकपिटमध्ये शिरला. पायलटच्या मानेवर पिस्तुल धरून त्याने विमान बैरुटला नेण्यास भाग पाडले.

बैरुटच्या विमानतळावर पुरेसे इंधन घेऊन गनिमांनी जंबो कैरोला नेण्यास भाग पाडले.

कैरोच्या विमानतळावरही त्यांनी हाच दम भरला—हालचाल केली तर विमान उडवून देऊ ! आत १५१ प्रवासी आहेत, लक्षात ठेवा !

हातावर हात चोळत बसण्याखेरीज विमानतळावरील लोक तरी काय करू शकत होते ? उरलेल्या विमानांनाही कमी अधिक याच पद्धतीने पळविण्यात आले. तीन विमाने अम्मानपासून पंचेचाळीस मैलावरील डिक्सन डॉसन फिल्डवर वाळवंटात उभी उतरविण्यात आली.

पॅलेस्टाइन मुक्ति संघटनेच्या तुलनेने लहान असलेल्या बंडखोरांनी अमेरिका, ब्रिटन, पश्चिम जर्मनी, स्वित्झर्लंड अशा बड्या लोकांना गप्प करून ठेवले. पळवून आणलेल्या विमानातील प्रवाशांना ओलीस ठेवून त्यांनी या देशांनी अटक केलेल्या

| विमान कंपनी | फ्लाईट नंबर | विमानाची जात | प्रवासी |
|---|---|---|---|
| टी. डब्ल्यू. ए. | टी. डब्ल्यु ७४१ | बोईंग ७०७ | १४९ |
| पॅन अॅम | पी. ए. ९३ | बोईंग ७४७ | १५१ |
| स्वीसेअर | एस्. आर. १०० | डग्लस डीसी–८ | १४३ |
| एल अल | एल्. वाय्. २१९ | बोईंग ७०७ | १४५ |
| बी. ओ. ए. सी. | बी. ए. ७७५ | सुपर व्हीसी–१० | १०४ |

अरब गनिमांची मागणी केली. इस्राइलने अटक केलेले गनिमही त्यांना हवे होते. गुरुवारपर्यंत गनिमांची सुटका केली नाही तर ही अवाढव्य विमाने उडवून टाकू अशी धमकी दिली.

सर्व संबंधित देशांनी भराभर विचार करायला सुरुवात केली. मंत्रिमंडळाच्या तातडीच्या बैठकी झाल्या. सर्व जगासमोर मोठा प्रश्न होता.

ओलीस ठेवलेल्या प्रवाशातील स्त्रिया–मुलांची सुटका करण्याचे इंटर नॅशनल रेडक्रॉसचे प्रयत्न यशस्वी झाले. त्यांना ' क्रांतिकारी विमानतळा 'वरून अम्मानच्या इंटर नॅशनल होटेलमध्ये अरब गनिमांनी पोहोचवून दिले.

रविवारपासून विमानात अवघडून गेलेल्या स्त्रिया – मुलांना आणि पुरुषांनाही – पॅलेस्टाइन मुक्ती आघाडीच्या लोकांनी खूपच नीट वागविले. त्यांना विमानाबाहेर पडण्यास बंदी होती. खाण्यापिण्याची काटकसरीने का होईना पण व्यवस्था होत होती. अरब डॉक्टर येऊन काहींवर औषधोपचारही करून गेला.

विशीच्या घरात असलेले हे सर्व गनिम मुलांशी खेळत होते. त्यांच्याबरोबर गाणी म्हणत होते. त्यांच्यातील तरुणी ' पाहुण्यां 'च्या मुलांना स्त्रीसुलभ वात्सल्याने कुरवाळून त्यांचे पटापट मुकेही घेत होत्या. बाबा लोकांनीही अजाणपणे आपल्या सामानातील खेळ काढून खेळायला सुरुवात केली होती.

अडचण फक्त होती मलमूत्र विसर्जनाची. शिवाय सतत वाळवंटातील धूळ येत होती. दिवसा खूप उकडत होते. रात्री गोठवून टाकणारी थंडी होती.

सहा दिवस. आणि सहा रात्री – जीव नकोसा करून टाकणाऱ्या, पुढे काय होणार आहे याची चिंता वाढविणाऱ्या.

शनिवारी सुमारे दोन तासाचे वादळ झाले. सर्वंत्र आसमंत वाळूने भरून गेला. काहीही दिसत नव्हतें.

पॉप्युलर फ्रंट फॉर द लिबरेशन ऑफ पॅलेस्टाईन – पॅलेस्टाईन मुक्ती आघाडी अजूनही प्रवाशांना सोडण्यास राजी नव्हती. या जहाल गटाबरोबर अरबांच्या पॅलेस्टाईन लिबरेशन ऑर्गनायझेशन या दुसऱ्या संघटनेचा वाद सुरू झाला होता.

लिबरेशन ऑर्गनायझेशनला इस्त्राइल व्याप्त प्रदेशाबाहेर कोणतीही कृती करणे मान्य नाही. हवाई चाचेगिरी, बॉम्ब फेकणे अशा गोष्टींचा तर ही संघटना निषेध करते.

दोन्ही संघटनात कडाक्याचा वाद झाल्यानंतर पॉप्युलर फ्रंटचे मन वळविण्यात ऑर्गनायझेशनला यश मिळाले.

स्त्रिया, मुले, म्हातारे व आजारी असलेल्यांची सुटका करण्याचे फ्रंटने मान्य केले. पुरुषांना मात्र अजूनही अडकवूनच ठेवण्यात आले. एव्हाना गनिमांनी तिन्ही विमानातून डायनामाईट पेरून ठेवले होते. बटन दाबण्याचाच अवकाश की सर्व उध्वस्त होणार होतें.

अम्मानहून छोटया बसेस आल्या. गनिमांनी सर्व प्रवाशांना पटकन् बाहेर पडण्यास सांगितले. शेवटचे दोघे तिथे उतरले, त्या पाठोपाठ त्यांच्यावर बंदुक रोखून उभे असलेल्या गनिमांनीही उड्या टाकल्या. काही यार्ड ते धावून गेले नाहीत तोच धडाधड स्फोट होऊ लागले.

कसल्याशा उन्मादाने गनिमांनी त्या धगधगणाऱ्या विमानांवर आपल्या मशिन-गनमधून गोळ्यांचा भडिमार केला !

स्त्रिया-मुले अम्मानमध्ये पोहोचली होती. पुरुषांना कुठे अज्ञात स्थळी नेण्यात आले होते.

लैला खलीद आणि तिचे साथीदार अजूनही पश्चिम राष्ट्रांच्या ताब्यात होते.

या हवाई चाचेगिरीचा उद्देश—? शांततेसंबंधीची बोलणी फिसकटविणे !

जॉर्डनमध्ये यादवी युद्ध सुरू होणार असे स्पष्टपणे दिसत असताना आणि नासेर व हुसेन यांच्या वॉशिंग्टनच्या शांतता योजनेला सहकार्य करण्याच्या निर्णयावर मध्यपूर्वेत तट पडले असतानाच ही हवाई चाचेगिरी व्हावी, यात योगायोग नाही.

| पायलट संख्या | निघाले | कोठून | कोठे | केव्हा व कोठे पळविले. |
|---|---|---|---|---|
| | रविवारी | | | |
| १० | सकाळी ११·३० | फ्रँकफर्ट | न्यूयॉर्क | दुपारी बेल्जियन फ्रंटवर. |
| १८ | दुपारी १·३० | ॲम्स्टरडॅम | न्यूयॉर्क | निघाल्यानंतर लगच, हॉलंडवर असताना. |
| १२ | दुपारी १२·४० | झुरिच | न्यूयॉर्क | निघाल्यानंतर ३०—४० मिनिटांनी फ्रान्सवर असताना. |
| १० | दुपारी १·७ | ॲमस्टरडॅम | न्यूयॉर्क | १ वाजून ५० मिनिटांनी क्लॅक्टनवर, अयशस्वी. |
| १० | बुधवारी सकाळी ७ | बेहरान | लंडन | पर्शियन गल्फवर. |

शांततेबद्दलची बोलणी उध्वस्त करावी, हे पॉप्युलर फ्रंटचे धोरण आहे हे निश्चित. हुसेन सरकारने शांततेची योजना सोडून द्यावी, अल फताहचे वर्चस्व झुगारून द्यावे, असे फ्रंटचे आधीपासूनचेच म्हणणे. अल फताहनेही शांतता योजना फेटाळून हुसेन व नासेर यांच्याबाबत 'थांबा, वाट पहा' असे धोरण स्वीकारले होते.

सर्व अरब गनीम 'भांडवलशाही विरोध' या जागतिक चळवळीच्या सूत्राने एकत्र बांधलेले आहेत. याशिवाय राष्ट्रवाद व सामाजिक क्रांती ही भावना आहेच. अरबांचा पराभव झाला याचे कारण ते तांत्रिक व सामाजिक दृष्टया मागासलेले आहेत आणि इस्त्राइलला पश्चिमेतील देशांनी, आंतरराष्ट्रीय ज्यू चळवळीने (झियॉनिझम्) व अमेरिकेने मदत केली म्हणून, असे गनिमांचे ठाम मत आहे.

पॅलेस्टाईनची चळवळ अल फताहला सर्वात महत्त्वाची वाटते, तर या चळवळीच्या निमित्ताने अरब देशांमधून क्रांतीचा प्रसार व्हावा असा फ्रंटचा आग्रह आहे. एक शत्रू मात्र सामाईक आहे – तो म्हणजे पश्चिमी भांडवलवाद. इस्त्राइलशी सहानुभूतीने वागणाऱ्या सर्व देशांशी लढण्यास फ्रंटची तयारी आहे.

अल फताह अजून नासेर व हुसेन यांच्यातून फुटून निघण्याची घाई करण्यास तयार नाही. पण फ्रंट हुसेनविरुद्ध जाण्यास तयार झालेली दिसते.

□ □ □


# शिलंगणाचं सोनं

**आवृत्ती : तिसरी**

ब. मो. पुरंदरे

किंमत : तीन रुपये

राजहंस प्रकाशन



# रोखलेल्या बंदुका उठलेली जनता

अनिल बर्वे लेखांक : सहा

वरंगळ सोडले – एस्. टी. हैद्राबादच्या दिशेने धावू लागली. मी बॅगेतून 'इमिजीएट प्रोग्राम'ची पुस्तिका बाहेर काढली. 'इमिजीएट प्रोग्राम'द्वारे नक्षलवाद्यांनी सशस्त्र बंडाची हाक दिली होती. ही पुस्तिका कम्युनिस्ट रेव्होल्युशनरी पक्षाचे (नागीरेड्डी ग्रुप) विचार स्पष्टपणे मांडते. या पुस्तिकेच्या पहिल्याच पानावर म्हटले आहे–

'स्वभावत:च दडपशाही – शोषण करणारे नोकरशहांचे, वडे भांडवलदारांचे आणि सरंजामदारांचे सरकार संपुष्टात आणले पाहिजे व त्या जागी खरे लोकशाही राज्य स्थापन केले पाहिजे.'

'सरंजामशाही नष्ट करून बड्या जमीनदारांची जमीन गरीब शेतकरी व भूमिहीन शेतमजुरात वाटली गेली पाहिजे.'

'उद्योग-धंद्यातले परदेशी भांडवल आणि कोलॅब्रेटींग कंपन्यामधील भांडवल ताब्यात घेतले पाहिजे.

अशा रीतीने पुस्तिकेच्या पहिल्याच पानावर क्रांतिकारकांनी प्रस्थापित सरकार-बाबतचे आपले विचार आणि क्रांतियुद्धाचा उद्देश स्पष्ट केला आहे. नक्षलवाद्यांनी आपल्या प्रत्येक हल्ल्यामध्ये 'जमीनदारांची जमीन भूमिहीनात वाटली गेली पाहिजे' असा घोशा करणारी पत्रके वाटली आहेत. या पुस्तिकेच्या पान ४–५–६ वर म्हटले आहे–

'देशरक्षणासाठी सध्याचे उभारलेले सैन्य हे यांत्रिक असून ते विलीन करून त्या जागी जनतेची क्रांतिकारक सेना उभी केली पाहिजे.'

नक्षलवाद्यांचा हा विचार मला फार आकर्षक वाटला. चौदा ऑगस्टपर्यंत स्वातंत्र्य–सैनिकांवर गोळीबार करणारे सैनिक पंधरा ऑगस्टला देशभक्त, प्राणार्पण करणारे वीर जवान झाले या भोंगळ समजुतीला काही अर्थ आहे का? आपल सर्व सेनापती व बडे अधिकारी हे खास ब्रिटिश तालमीत वाढल्याने ते ब्रिटिश-अमेरिकन साम्राज्यवाद्यांचे मानसिक गुलाम बनले असून, अधून मधून संधी मिळेल तेव्हा लोकनियुक्त प्रतिनिधींना बदनाम करणारी आणि लष्करी हुकूमशाहीला प्रोत्साहन देणारी वक्तव्ये करीत असतात. अर्थात सैन्य व पोलीसदले ही सत्ताधाऱ्यांची दडपशाही करण्याची हत्यारे असल्याने व ब्रिटिश सरकार आणि सध्याचे भारत-सरकार यांचे उद्दिष्ट जनतेला दडपण्याचेच असल्याने सत्तांत्तरानंतर सध्याच्या भारतीय सत्ताधाऱ्यांनी या यंत्रणेत काहीही बदल केलेले नाहीत.

या पुस्तिकेच्या पान दोनवर म्हटले आहे–

'जनक्रांती हे माओच्या विचारांचे महत्त्वपूर्ण उद्दिष्ट आहे व त्याकरता ग्रामीण विभागातून गनिमी युद्धास अनुकूल भूमी निर्माण करणे आणि शहरांना वेढून अखेर सर्व देश मुक्त करणे हा आपला मार्ग असला पाहिजे. भारतीय क्रांतीसाठी जनतेस युद्धाकरता प्रवृत्त करणे हे क्रांतिकारकांचे महत्त्वपूर्ण काम आहे.'

'क्रांतीच्या यशस्वितेसाठी श्रमिक जनतेची (शेतकरी-कामगार) आघाडी महत्त्वपूर्ण आहे. ही आघाडी साम्राज्यशाही, सरंजामशाही व त्यांच्या हितसंबंधीय बड्या भांडवलदारांविरुद्ध असेल. कामगारवर्गाच्या नेतृत्वाखाली ही आघाडी कामगार, शेतकरी, मध्यमवर्ग व राष्ट्रीय भांडवलदारांची भक्कम एकजूट घडवेल. फेरविचारवाद्यांच्या संयुक्त आघाड्यांप्रमाणे ही आघाडी संसदीय मार्गावर न जाता

प्रत्यक्ष क्रांतिकारी हालचाली करेल व सशस्त्र मुक्तियुद्ध आरंभेल.'

'जनक्रांती घडवण्यासाठी व श्रमिकवर्गाची भक्कम आघाडी उभारण्यासाठी 'लोकशाही क्रांतिकारक कार्यक्रम' अंगिकारणारी व मार्क्स-लेनीन-माओ यांच्या विचारपद्धतीने चालणारी क्रांतिकारी कम्युनिस्ट पार्टी उभारणे हे भारतीय क्रांतीचे आवश्यक पाऊल आहे.'

'विविध प्रांतातील क्रांतिकारकांनी अशा क्रांतिकारक पक्षाच्या उभारणीसाठी पुढे सरसावले पाहिजे. हा पक्ष फेरविचारवादी व दुरुस्तीवाद्यांच्यापेक्षा पूर्णतया वेगळा असेल. फेरविचारवादी व दुरुस्तीवाद्यांनी भारतीय क्रांतीस चुकीच्या मार्गावर लोटले. ग्रामीण विभाग व्यापून शहरे मुक्त करण्याच्या आपल्या अंतीम हेतूस अनुसरून ग्रामीण व शहरी विभागाकरता त्वरित चळवळीचा कार्यक्रम आखणे आवश्यक आहे.'

इमीजिएट प्रोग्रामच्या पान तीनवर श्रीकाकुलम्-वरंगळ व खम्मम येथील चळवळीचे व परिस्थितीचे विश्लेषण केलेले आहे. त्यात म्हटले आहे–

'श्रीकाकुलम् येथील एजन्सी एरियामधील चळवळ ही सशस्त्र लढ्याच्या पायरीपर्यंत येऊन पोचलो आहे. वरंगळ व खम्मम जिल्ह्यातील जंगलमय विभागातील चळवळींनीही सर्वसाधारण कायद्याच्या मर्यादा उल्लंघल्या असून या चळवळीत भूमिहीन शेतमजूर आघाडीवर आहेत. केवळ जंगलातील पडीक जमीनच नव्हे तर जमीनदारांनी अन्यायाने बळकावलेल्या जमिनींचा ताबा घेण्यासाठी लढाऊ गट दिवसेंदिवस पुढे सरसावत आहेत. पूर्व गोदावरी जिल्ह्यातील एजन्सी एरीयामध्येही 'मुतद्दारी' विरुद्ध उग्र चळवळ होत असून जमिनीचा कबजा घेण्यास शेतमजुरांनी सुरुवात केली असून ही चळवळ विशाखापट्टम व बस्तर येथील एजन्सी एरीयापर्यंत फोफावली आहे. अदीलाबाद व करीमनगर जिल्ह्यातूनही अशीच परिस्थिती आहे.'

'पठारावरील जंगलमय विभागातूनही काही जिल्ह्यातील चळवळ जमीनदारांकडून धान्य काढून घेण्यापर्यंत गेली आहे. ही स्थिती गेल्या जुलै व ऑगस्टपासून निर्माण झालेली आहे. खम्ममधील मदीरा विभाग व वरंगळमधील जनगाव आणि मनुकोट तालुक्यात वरील स्थिती अजून कायम आहे. नलगोंडा जिल्ह्यातील जनचळवळ ही जमीनदार व सरकारच्या दडपशाहीस उघड प्रतिकार करू लागलेली आहे. सरकारची अमानुष दडपशाही सहन करूनही येथील चळवळ पुनश्च लढ्यास उभी आहे.'

याच पुस्तिकेत पान चारवर म्हटले आहे–

'काही विभागात छोट्या जमीनदारांकडून जमिनी काढून घेण्यापर्यंत सशस्त्र लढा विकसित झाला आहे. आता आपण 'शेतकी क्रांतीसाठी' आवश्यक अशा पद्धतीने जमिनी कुठे व कुणास कशारीतीने वाटावयाच्या हा निर्णय घेतला पाहिजे.

जमिनींचा कब्जा घेऊन भूमिहीन शेतमजुरांमध्ये तिचे वाटप योग्य रीतीने करण्यावर आपण लक्ष केंद्रित केले पाहिजे.'

याच पुस्तिकेच्या पान सहावर म्हटले आहे–

'जंगलमय व डोंगराळ विभाग हा 'जनतायुद्धाचा' मुख्य आधार आहे. या विभागात शत्रू अत्यंत कमजोर तर आहेच, त्याचबरोबर हा विभाग गनिमीयुद्धास अनुकूल असून या आधारावर संरक्षक-युद्धे खेळता येतील. गनिमीतळ स्थापण्यासाठीही हा विभाग अत्यंत सुरक्षित आहे. सर्वसाधारण जनतेला व आदिवासींना जमीनदार, सावकार व जंगल अधिकारी विविध मार्गाने पिळत आहेत आणि म्हणूनच या विभागातील जनता वरील शोषक वर्गाविरुद्ध बंडास उत्सुक आहे. श्रीकाकुलम्‌मधील गिरीजनांचा लढा हा बंडाचे प्रमुख पाते आहे. या विभागात पडीक जमिनी व जमीनदारांकडील वरकड जमिनी प्रचंड प्रमाणावर आहेत. गुरांच्या धंद्यावर येथील व्यापाऱ्यांनी लाखो रुपये कमावले असून त्यांच्याकडे प्रचंड प्रमाणावर गुरे आहेत. तेव्हा सरकार पडीक जमिनी, जमीनदारांकडील वरकड जमिनी व गुरे यांचे वाटप भूमिहीन शेतमजुरात करणे आवश्यक आहे.'

पान सातवर म्हटले आहे–

'या प्रथा नष्ट करण्यासाठी जनतेस स्वतः क्रांतिकारक लढ्यास उभे राहिले पाहिजे. जरी जंगलमय व डोंगराळ प्रदेशाएवढा पठारी प्रदेश गनिमीलढ्यास अनुकूल असला तरी पूर्ण कुचकामी आहे असे समजणे चुकीचे ठरेल. प्राप्त परिस्थितीत काही मर्यादेपर्यंत पठारावरही गनिमी लढा देता येईल. या विभागात तेलंगणचा उठाव झाल्याने जनतेस अशा उठावांची सवय असून या विभागातून सशस्त्र लढ्यासाठी लढाऊ अनुयायी मिळू शकतील. आणि हा क्रांतिकारक कार्यक्रम अंमलात आणण्यासाठी कोणत्याही प्रकारे 'शॉर्टकट मेथडस्' उपयोगात आणल्या जाता कामा नयेत. मतदानावर बहिष्कार टाकण्याच्या मार्गाऐवजी 'जनयुद्धा'चा मार्ग लोकांना सांगितला पाहिजे,' असे पुस्तिकेत पान दहावर म्हटले आहे.

'जनतायुद्ध म्हणजे इतर काही नसून ग्रामीण सोव्हिएतस् व जनसमित्यांची स्थापना होय. आपला कार्यक्रम हा 'शेतकी क्रांतीचा' आहे. सोव्हीएतस् व जनक्रांती यांचे द्वारा अखेर आपणास 'जनतेच्या लोकशाही क्रांतिकारक राज्याचा पाया बांधायचा आहे.'

परंतु कार्यक्रमात असे नमूद केले असूनही वरंगळ वा खम्मम येथे नक्षलवाद्यांनी कोठेही 'सोव्हीएतस्' स्थापन केलेली नाहीत. 'सोव्हीएतस्' स्थापण्यात नक्षलवाद्यांना जरी यश आलेले नसले तरी या पुस्तिकेवरून त्यांचे धोरण स्पष्ट होते. श्रीकाकुलम् येथे मात्र चारू मुझुमदारच्या 'कम्युनिस्ट पार्टी-मार्क्सीस्ट लेनिनीस्टने काही ठिकाणी कम्युन्स व पीपल्स कोर्टस्‌ची स्थापन करण्यात यश मिळवले आहे.

या यशाला निसर्गानेच इतर विभागापासून मुक्त केलेला पार्वतीपुरम् तालुक्यातील अंतर्गत भाग कारणीभूत आहे. जसजसे नक्षलवादी यशस्वी होत जातील तसे तसे कम्युन्स व पीपल्स्कोर्ट या प्रकारांचे जादा प्रयोग होत राहतील. 'इमिजीएट प्रोग्रामच्या' अकराव्या पानावर म्हटले आहे–

'आपण 'शेतकी क्रांतीचा' कार्यक्रम जसा अंमलात आणू लागू तसा सरकार व पोलिसांकडून विरोध व दडपशाही सुरू होईल. अशा वेळी दडपशाहीचा प्रतिकार करण्यासाठी आपल्या नियमित फाइटिंग स्क्वाडस्च्या मदतीला स्थानिक फाइटींग स्क्वाडस्चीसुद्धा आवश्यकता भासेल. त्याकरता स्थानिक 'दलम्स्' उभारले जावेत व त्यामध्ये तेथील गरजांप्रमाणे सात किंवा कमी जास्त सैनिक असावेत. त्यांच्याकडे तलवारी, भाले, धनुष्यबाण आदी शस्त्रे असावीत.'

'या स्थानिक दलमस्ला स्थानिक वर्गशत्रू घाबरेल. या दलमस्चा स्थानिक वर्गशत्रूवर हल्ला करायला जास्त चांगला उपयोग होईल. या स्थानिक दलमस्नीच जमीनदारांवर हल्ला करायला पुढाकार घ्यावा. या व्यतिरिक्त नियमित दलमस्ना त्यांची चांगली मदत होईल. नियमित दलमस्ना जास्तीत जास्त आधुनिक शस्त्रास्त्रे व युद्धनीतीचे शिक्षण दिले गेले पाहिजे.'

यानंतर जिल्हावार स्थितीचे विश्लेषण असून, सशस्त्र लढ्याची गती वाढवण्यावर भर दिलेला आहे. यानंतर कामगार व विद्यार्थी यांच्या क्रांतीमधील भूमिकेचा विचार मांडताना पुस्तिकेच्या बाराव्या पानावर म्हटले आहे –

'गावामध्ये राहण्याचे धोरण चुकीचे असून आपण जंगलाचा आश्रय घेतला पाहिजे. गावातील श्रमजीवींची मदत आपणांस वाहतूक, रसद पुरवठा आणि दळणवळणासाठी अत्यावश्यक आहे. याचकरिता विद्यार्थ्यांचेही महत्त्व फार आहे. शहरातील व गावातील आपल्या हालचालींसाठी विद्यार्थ्यांच्या मदतीचा फार मोठा उपयोग होईल. आज विद्यार्थ्यांना क्रांतिकारक विचारांनी आकर्षित केले आहे. तेव्हा त्यांना मार्क्स–लेनिन–माओ यांची विचारसरणी शिकवली पाहिजे.'

यानंतर पुस्तिकेच्या समारोपात म्हटले आहे – 'आपण प्रथम खेडी व्यापून नंतर शहरे मुक्त करण्याचा मार्ग स्वीकारला असून त्याकरता ग्रामीण विभागातील कार्यक्रम हाती घेतला पाहिजे. क्रांतिकारक चळवळ दडपण्याचा सत्ताधाऱ्यांचा प्रत्येक प्रयत्न हाणून पाडला पाहिजे. त्याचबरोबर क्रांतिकारक पक्षाची स्थापना करून जनक्रांतीच्या सहाय्याने सत्ता काबीज करून ग्रामीण विभाग मुक्त करायला पाहिजे.'

श्रीकाकुलम् येथील सशस्त्र लढ्याच्या प्रगतीचा उल्लेखही या पुस्तिकेत असून त्यावरील 'स्वतंत्र अहवाल' तयार केल्याचा निर्देश आहे. तेथील लढ्याच्या संबंधात पुस्तिकेत म्हटले आहे –

श्रीकाकुलम् येथील चळवळीतील मागील चुका लक्षात घेऊन त्यांची पुनरावृत्ती होणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे. श्रीकाकुलम् येथे लढत असलेल्या कॉम्रेड-

सूच्या अनुभवातून आपण ज्ञान घेतले पाहिजे व त्यांना आपले अनुभव दिले पाहिजेत, आपण श्रीकाकुलम् येथील चळवळीला केवळ पाठिंबा देऊन भागणार नाही तर वर्गशत्रूंनी चालवलेल्या त्याविरुद्धच्या विकृत प्रचाराचाही समाचार घेतला पाहिजे.'

वरंगळ व खम्मम येथे एरीया कमिटचा स्थापल्या असून त्यांना सशस्त्र लढयात पुढाकार घ्यायला सांगितले असल्याचा उल्लेख पुस्तिकेत आहे. विविध विभागातील युनिटस्‌चा लोकशाही केंद्रीकरणाशी सुसंगत धोरण आखण्याचा आदेश असून पक्षातील सर्व सभासदांना 'जनयुद्धाचा मार्ग' स्वीकारण्याचे आवाहन केले आहे.

'तक्षण कार्यक्रम' या तेलगू पुस्तिकेवरून 'पेरीमॅसन' इंग्लिश जाणणाऱ्या विद्यार्थ्याने केलेले इंग्रजी भाषांतर व त्याच्या लिपीचा बोध घेत घेत मी केलेले त्याचे मराठी रूपांतर, या अवतारचक्रातून अनुवाद आलेला असल्याने अनुवादात शाब्दिक चुकांचीही बरीच शक्यता आहे, परंतु अर्थाविषयी मात्र खात्री आहे.

जोराचा धक्का बसला नी मी भानावर आलो. माझ्या हातात इमिजीएट प्रोग्राम होता. हैद्राबाद शहर आलेले होते. आळस झाडून मी लांब पाहिले — चारमिनारावरची कबुतरे आकाशात स्वतंत्रपणे विहार करीत होती.

म्हाताऱ्या रिक्षावाल्याला तो चढ चढवत नव्हता — मी रिक्षातून उतरलो. सामान्य माणसाला न चढता येणाऱ्या चढावर विधानसभागृह आहे. आमदारांच्या-मंत्र्यांच्या मोटारी टॅक्सी विधानसभेकडे पळत होत्या. आज एम्. एल्. सी. च्या निवडणुका असल्याने सर्व 'राजकारणी' कौटिल्याचा वारसा चालवत होते. विधानसभेच्या प्रवेशद्वारांवर कडेकोट पोलीस बंदोबस्त होता. कुणीतरी माझी आंध्रचे गृहमंत्री जे. वेंगलराव यांच्याशी ओळख करून दिली. माणूस लबाड आहे असे मला वाटले. पाठीमागच्या बाजूला आरामशीर सोफ्यांवर पंख्याच्या वाऱ्यात 'जनतेचे प्रतिनिधी' दळीद्री नारायणाची काळजी वाहत होते. मिल्कबारमध्ये मलईदार दूध पिणाऱ्यात व राजकारणावर 'सुखसंवाद' करणाऱ्यात मार्क्स-लेनीनचा घोष करणारे साम्यवादी आमदारही होते. तेथल्या ढोंगी वातावरणाची किळस येऊन मी बाहेर पडलो —

हजारच्या वास्तुशिल्प संग्रहातील गंधर्व-किन्नरांचे चेहरे छिन्न विच्छिन्न झालेले होते, दैत्य विक्राळ हास्य करीत होते !

कशासाठी पोटासाठीच्या चालीवर धापा टाकीत गाडी पळत होती — हिरव्यागार शेतातून-डोंगर कपारीतून-लांबचलांब धुराच्या रेषा आखत गाडी पळत होती. लहानपणी खिडकीजवळ बसायला फार आवडायचं — आता आवडत नाही, कारण बाहेर भुकेली माणसं दिसतात. दहा-वीस तासांच्या रटाळ प्रवासानंतर विजयनगरम् आले.




विजयनगरम् – एक बलाढ्य गतकालीन हिंदू साम्राज्य; रेल्वे स्टेशन इतके टुमदार व सुंदर होते – वाटले, शहरही तसेच असेल, पण बाहेर आलो तर तेच खडबडीत रस्ते, तीच चंद्रमौळी घरे व भुकेले चेहरे. गावातल्या शेवाळलेल्या तलावाच्या काठी गतकालीन सम्राटांचे निर्जीव पुतळे उभे होते.

विजयनगरम् हे शहर प्रत्यक्षात विशाखापट्टम् जिल्ह्यात आहे व त्याचा महसूलही विशाखापट्टम् जिल्ह्यात जमा होतो. परंतु इमारती व पोलीस ट्रेनिंग स्कूल आदींच्या सोयीमुळे श्रीकाकुलम् जिल्ह्याचे पोलीस हेडक्वार्टर्स विजयनगरम्लाच ठेवलेले आहे. मी गेलो तेव्हा एस्. पी. श्रीकाकुलम्ला गेलेले होते. पहाटेच्या बसची चौकशी करून तिथल्या एका लॉजवर गेलो. रात्री माझ्या स्वप्नात तालीकोटच्या भुतांनी थैमान घातले. पहाट झाली – एस. टी. श्रीकाकुलम्कडे पळू लागली. नरमुंडमाला घातलेल्या देवीचा फोटो ड्रायव्हरने पूजेच्या हारांनी सजवला होता – खरंच, बुद्ध इथे जन्मला होता काय ?

श्रीकाकुलम् – भारतीय जनतेच्या दुसऱ्या मुक्तिसंग्रामाचे प्रमुख ठाणे. जंगलांनी–डोंगरांनी व्यापलेल्या या जिल्ह्याच्या इतिहासात ३१ आक्टोबर १९६७ हा दिवस 'लाल अक्षरात' लिहिला गेलेला आहे. त्या दिवशी मोंडखळ या सभास्थानी आपल्या मागण्यांसाठी जंगलातले आदिवासी-शेतकरी गटागटांच्या मिरवणुकीने चालले होते. गिरिजनांची संघटना व सामर्थ्य पाहून भडकलेल्या जमीनदारांनी व त्यांच्या गुंडांनी सभेकडे चाललेल्या एका गिरिजनांच्या मिरवणुकीवर 'लेवेडी' येथे गोळीबार केला. दोन गिरिजन मारले गेले. संतापलेल्या गिरिजनांच्या जमावाने जमीनदारांच्या जमिनीचा कबजा घेतला. संपत्ती लुटली. यापैकी सोने क्रांतिकारकांच्या 'पार्टी सेंट्रल हेडक्वार्टर्स'कडे रवाना झाले. नंतर सदैव जमीनदार व गिरिजन यांच्यात चकमकी उडत गल्या. गिरिजनांनी लाल बावटा फडका-

वला आणि 'दलमस्' उभारून पोलीसांशी व जमीनदारांशी टक्कर दिली. मार्च ६८ ला पोलीस व गिरीजन यांच्यात मोठा संघर्ष झाला. तीन गिरिजनांना 'अशोक-चक्रा'च्या साक्षीने गोळ्या घातल्या गेल्या. २०० गुडेन्सवर छापे घालण्यात आले. (५० घरांचे गुडेन्स ऊर्फ वाड्या होतात). हजार गिरिजनांना अटक करण्यात आली. पोलीस दडपशाहीच्या नव्याने वर्णनाची जरुरीच नाही. मग मार्च ते नोव्हेंबर भीषण शांतता पसरली. क्रांतिकारक जागृत व संघटित झाले. सभा चर्चासत्रे चालूच राहिली. याच काळात कनु संन्याल या विभागात येऊन गेला. त्याने क्रांतिकारकांना लढ्याकरता मार्गदर्शन केले. आपसातील मतभेद संपवले आणि मग —

पार्वतीपुरम — पाथनाटनम् — पालकोंडा हे प्रदेश पेटून उठले. दरम्यान सोंमपेठ — बॉबीली — उदनस या पठारी प्रदेशावरही चळवळ पसरली. २४ मार्च ६९ ला 'वाराणसी नित्यानंदम्' या जामीनदाराची जमीन कबजात घेऊन भूमिहीनांमध्ये त्याचे वांटप झाले. हळूहळू किसान–शेतकरी लालझेंड्याखाली संघटित होऊ लागले. मार्च ६९ ला जमिनी ताब्यात घेण्याचा फतवा क्रांतिकारकांनी काढला व सर्वत्र 'संग्राम समित्या' स्थापण्यात आल्या. 'पीपल्स आर्मी'ची स्थापना करण्यात येऊन २०० तोळे सोने लुटण्यात आले. आठ जमीनदार व एकोणतीस पोलिसांना कंठस्नान घालण्यात आले. पोलीस ऑफिसर्स हे वर्गीयशत्रू म्हणून जाहीर करण्यात आले. सामान्य गरीब पोलिसांना निःशस्त्र करण्यात येऊ लागले. आक्टोबर ६९ ला सहा तालुके मुक्त केल्याची व लाल राज्याची घोषणा करण्यात आली.

आंध्र व ओरिसा हद्दीवरच्या या मुक्त सेंट्रल प्रदेशात भारतीय सत्ताधाऱ्यांनी सेंट्रल रिझर्व पोलीस फोर्स घुसवला. जनतेने रिझर्व पोलिसांना नष्ट करावे अशी हाक देण्यात आली. पीपल्स आर्मी जरी शस्त्रसज्ज व पुरेपूर तयार नव्हती तरी तिला नियमावली व नीतिमत्तेचो कुंपणे घालण्यात आली. वरिष्ठांचे ऐका, जनतेला लुटू नका, लुटले असल्यास मालमत्ता ज्याची त्याला परत करा हे नियम पीपल्स आर्मीतल्या सैनिकांना लागू करण्यात आले. 'सभ्य वागा, प्रत्येक गोष्टीचे योग्य दाम घ्या, फुकट काही लुटू नका, लोकांना मारहाण करू नका, कैद्यांना चांगले वागवा स्त्रियांशी सभ्यतेने वागा' ही गनिमांची नीतिमत्ता होती. पोलिसांच्या झोटिंगशाही वागणुकीवर क्रांतिकारकांचे हे वर्तन उठून दिसले.

एवढ्या रणधुमाळीत पी. के. हा नक्षलवादी नेता मारला गेला. २२ नोव्हेंबरला क्रांतिकारकांचे जिल्हा पुढारी चंगती भास्करराव आणि गणपती हे मारले गेले. डिसेंबर ६९ मध्ये नक्षलवाद्यांनी भारतीय सत्ताधाऱ्यांवर आरोप केला की, 'अटक करण्यात आल्यावर क्रांतिकारकांना गोळ्या घालण्यात आल्या.' पोलिसांनी चौकशी-विना खून पाडण्याचे धोरण अंगिकारले. क्रांतिकारकांनी मात्र 'जनता न्याया-लयाच्या' फर्मानाशिवाय कोणावरही हत्यार चालवले नाही. डिसेंबर ६९ पर्यंत २००० क्रांतिकारकांना अटक करण्यात आली व ३२ नेते मारले गेले.

लोकांना लाल राज्यात सामील होऊन जमीनदारशाही व पोलिसशाही यातून मुक्त होण्याचा आदेश दिल्यावर श्रीकाकुलम् येथील क्रांतिकारक लढा तीन टप्प्याने विकसित होत गेला. प्रथम दलमसनी घातलेले गुप्त छापे, नंतर जनतेच्या सहाय्याने भूमिवाटप, तीसऱ्या अवस्थेत प्रत्यक्ष जनतेने सशस्त्र लढ्यात भाग घ्यावयास सुरुवात केली, 'जनता न्यायालये' भरविण्यात येऊ लागली.

नक्षलबारी व तेलंगणातील चुका लक्षात घेऊन येथील लढा राजकीय बनविण्यात आला आहे. या विभागास चारू मुझुमदार व कनु संन्याल यांनी अनेक भेटी दिल्या. दीर्घकाळ चालणाऱ्या या लढ्याची जाणीव ठेवून चार वर्षांचा दीर्घमुदतीचा कार्यक्रम आखण्यात आला. जनतेला शिक्षण देण्यास सुरुवात करण्यात आली. व्याज माफ करणाऱ्या सावकारांना अभयदान देण्यात आले व लढा जास्त व्यापक व संघटीत करून 'गुरीलांचे भक्कम पाय' रोवण्यात आले.

श्रीकाकुलम् हा जिल्हा पूर्वघाट व पठारी प्रदेश यांनी वेढला असून, आंध्र-ओरीसाच्या सरहद्दीवर आहे. कोरापूट येथे आंध्रची सरहद्द ओलांडून ओरिसात जाता येत असल्याने रिझर्व पोलिसांपासून संरक्षण मिळते. या विभागात ८०००० च्यावर गिरीजन असून तेथे जातवस व सावरस या दोन टोळ्या आहेत. या ८०० चौ. मैल विभागात 'कलींगा' या ओरिसातील जमातीचे लोकच सावकार, जमीनदार व पुढारी असून कॉंग्रेसचे पाठीराखे आहेत. पोलिसांच्या मदतीने या लोकांनी गेली कैक वर्षे जनतेची पिळवणूक केल्याने हा विभाग सतत अशांत व स्फोटक बनला होता.

वेमपटप्पू सत्यनारायणम् उर्फ 'सत्यम्' हा येथल्या आदिवासींचा अनभिषिक्त सम्राट होता. गेली पंधरा वर्षे तो या विभागात तन–मन–धन अर्पून जनसेवा करीत होता. सुरुवातीस तो बारुवा येथे शाळामास्तर म्हणून येऊन स्थायिक झाला. तेथे तो 'लेबर कॉन्ट्रॅक्ट सोसायटीचा' प्रमुख होता. त्याने गिरीजनांची भक्कम संघटना बांधून त्यांच्यावरच्या अन्यायाला वाचा फोडण्यास सुरुवात केली. प्रथम पत्नीची परवानगी घेऊन एका गिरीजन आदीवासी मुलीशी लग्न केले. आदीवासींशी तो पूर्ण समरस झाला होता. त्यांची भाषा, चालीरीती त्याला पूर्णपणे अवगत होत्या. त्याच्या संघटनाकौशल्याचे कॉ. सुंदरय्या व नागीरेड्डीने फार कौतुक केले. सत्यम् काही कालानंतर डाव्या कम्युनिस्ट पक्षात सामील झाला. नक्षलवाद्यांनी स्वतंत्र पक्ष काढल्यावर तो नागीरेड्डीबरोबर पक्षाबाहेर पडला व पुढे नागीरेड्डी ग्रुप सोडून चारू मुझुमदार ग्रुपमध्ये सामील झाला. सत्यम् व कैलासम् हे दोघे श्रीकाकुलम् येथील महत्त्वाचे नेते होते. सदैव पोलीस आणि जमीनदारांच्या डोळ्यात ते खुपत होते. सत्यम्ला पकडण्यासाठी जंगली सत्ताधाऱ्यांनी मध्ययुगीन प्रथेचा वापर करून सत्यमचे डोके कापून आणणाऱ्यास १५००० रुपयांचे बक्षीस लावले होते.

सत्यम् व कैलासम् हे दोघे १० जुलै ७० ला पार्वतीपुरम् येथील एजन्सी एरीयात बोरीहील्स विभागात पोलिसांबरोबर चकमक उडून मारले गेले. 'मारले गेले' हा

सरकारचा दावा आहे. पण नक्षलवाद्यांच्या म्हणण्याप्रमाणे त्यांना अटक करून नि:शस्त्र केल्यावर गोळया घालण्यात आल्या. नक्षलवाद्यांच्या बोलण्यात तथ्यांश असण्याची जास्त शक्यता आहे. कारण पोलिसांबरोबर उडालेल्या चकमकीत इतर नक्षलवादी कसे मारले गेले नाहीत ? पोलिसांपैकी कोणीही कसा मारला अथवा जखमी झाला नाही? पोलीस अहवालाप्रमाणे सत्यम्, कैलासम् यांच्याकडे ३ नॉट ३ रायफली होत्या–मग ते लढले तेव्हा त्यांना नेमबाजी येत नव्हती काय ? श्रीकाकुलम्च्या S. P. शी बोलताना त्याने सांगितले–'सत्यम् व कैलासम् एका कड्याखाली कँप टाकून होते. तेव्हा दोन तुकड्यांनी त्यांना सर्व बाजूने वेढल्याने त्यांना पळायला जागा नव्हती.' पोलिसांचा हा दावा जर खरा असेल तर नक्षलवाद्यांच्या आरोपाला जास्त पुष्टी मिळते. दोन तुकड्यांशी, पळण्यास वाट नसताना लढण्याइतका सत्यम् खचितच गाढव नसावा. शस्त्र टाकून तो पोलिसांच्या स्वाधीन झाला असावा. पोलिसांनी नंतर त्या दोघांना गोळी घालून 'इनाम' पटकावले असेल.

कौला वेंकेट यास तिरुपती–जिल्हा गुंटूर येथे अटक झाली. तो क्रांतिकारकांच्या सप्लायवर लक्ष ठेवीत होता. कौला वेंकेट याने ६८ ला मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टीच्या सेक्रेटरीएटचा राजीनामा दिला. नागीरेड्डींबरोबर प्रथमपासूनच तो होता. परंतु फेब्रुवारी ६९ ला जेव्हा 'आंध्र को ऑर्डीनेशन' कमिटीमध्ये दुफळी झाली तेव्हा कौला वेंकेट हा आपल्या साथीदारांबरोबर 'ऑल इंडिया को ऑर्डीनेशन कमिटीला' सामील झाला. त्याने नागीरेड्डी ग्रुपच्या 'जनशक्ती' या सप्ताहिकाला रामराम ठोकला. चौधरी तेजस्वीराम हा पदवीधर असून स्वतंत्र आमदाराचा मुलगा आहे. त्यास अटक झाली असून वैजाख जेलमध्ये ठेवण्यात आले आहे. मी त्यास भेटावयास गेलो होतो. परंतु मला त्यास भेटू देण्यात आले नाही.

आज जरी श्रीकाकुलम्मधील प्रथम श्रेणीचे पुढारी अटकेत असले किंवा मृत्यू पावलेले असले तरी तेथील अनेक गट अजून बाहेरच असून त्यातले काहीजण हळूहळू रणांगणात उतरत आहेत. ऑगस्टच्या पहिल्याच तारखेला पार्वतीपुरम् येथे दोघांचे बळी घेऊन नक्षलवाद्यांनी स्वत:ची प्रखरता स्पष्ट केली. जोपर्यंत जनतेवरील अन्याय व शोषण कायम आहे, पोलिसांची अमानुष दडपशाही चालू आहे व हैद्राबादला जमीनदार सावकारांचे राज्यकर्ते आहेत तोपर्यंत श्रीकाकुलम्मधील चळवळ थांबायची नाही.

डी. एस. पी. ला चार वाजता भेटायला जायचे होते. वेळ काढायला मी हॉटेलात जाऊन बसलो. माझ्या समोर एक सब-इन्स्पेक्टर, गावातील एक पुढारी आणि एक मनीलेंडर गप्पा मारीत चहापाणी करत होते.

क्रमशः

प्रसिद्ध गुजराती साहित्यक श्री. गुलाबदास ब्रोकर यांचे नाव मी कधीतरी ऐकले होते. काहीसे वेगळे असल्यामुळे ते माझ्या सहज लक्षात राहिले होते. एक-दोन वेळा त्यांचे बोलणे ऐकण्याचा योगही आला होता. पण प्रत्यक्ष परिचय नव्हता.

काही दिवसांपूर्वी, माझे मित्र व सहकारी श्री. दीपक मेहता यांनी, श्री. गुलाबदास ब्रोकर यांना २७ सप्टेंबरला साठ वर्षे पुरी होत आहेत, अशी माहिती सांगितली. ही संधी साधावी असे मला वाटले. मेहता यांच्याच साहाय्याने शेवटी मुलाखतीचा योग जमून आला.

अनंत भावे

माणसांच्या मनातल्या सूक्ष्म हालचाली टिपण्याचे मला आकर्षण आहे

# गुलाबदास ब्रोकर

मुलाखतीच्या प्रारंभी मी विचारले : आपला जन्म कधी झाला ? (हा साधा प्रश्न श्री. गुलाबदासांना विचारण्यात विशेष अर्थ होता. कारण काही ठिकाणी २७ सप्टेंबर १९०९ अशी त्यांची जन्म-तारीख उल्लेखिली होती, तर 'ग्रंथ अने ग्रंथकार' या गुजराती संदर्भकोशात २० सप्टेंबर १९०९ अशी जन्मतारीख दिली होती. असा जन्मतारखांबद्दलचा वाद महाराष्ट्राला किती प्रिय आहे, हे मला अर्थातच ठाऊक आहे.)

ब्रोकर : पुष्कळ वर्षं मी २० सप्टेंबर १९०९ हीच जन्मतारीख लावत होतो. मग एकदा माझ्या ज्योतिषवेड्या मित्रानं माझी जन्मपत्रिका मागितली. ज्योतिष पाहण्याबद्दल काही पैसे द्यावे

लागणार नाहीत, याची खात्री मी आधीच करून घेतली होती. त्याच्या मते माझ्या जन्मपत्रिकेतला जन्मदिनांक निर्देश चुकीचा होता. माझी जन्मतारीख २७ सप्टेंबर १९०९ असली पाहिजे, असं त्यानं ज्योतिषी ठामपणानं सांगितलं.

मी जन्मतारीख बदलली.

मी : जन्म कोणत्या स्थळी झाला ?

ब्रोकर : माझा जन्म पोरबंदरला झाला. या जगद्विख्यात स्थळी जन्म झाला याचा मला अभिमान वाटतो.

मी : आपलं बालपण पोरबंदरलाच गेलं ? बालपणीच्या काही आठवणी सांगणार काय ?

ब्रोकर : सहाव्या म्हणजे हल्लीच्या दहाव्या ईयत्तेपर्यंत मी पोरबंदरच्याच शाळेत होतो. माझे वडील शेअरब्रोकर होते. फारसे शिकलेले नसले तरी वाचनाचा मोठाच छंद होता त्यांना. त्यामुळं घरी भरपूर पुस्तकं होती. 'शृंगारवैराग्यतरंगिणी' असं वडिलांच्या या पुस्तकसंग्रहाला म्हणत; त्यावरून त्यातल्या पुस्तकांची काही कल्पना येऊ शकेल.

माझ्या वडिलांनी 'पोरबंदरी' या टोपणनावानं एक पुस्तकदेखील लिहिलं होतं. पुस्तकाचं नाव होतं 'दिव्ययात्रा.' बनियनच्या 'पिलग्रिम्स प्रोग्रेस'वरून ते पुस्तक लिहिण्याची कल्पना सुचली होती.

शाळेतले शिक्षक चांगले होते. विशेषतः इंग्रजीचे शिक्षक. माझाही अभ्यास चांगला होता.

मी : खरं म्हणजे बालपणाबद्दल विचारण्याच्या आधी एक वेगळाच प्रश्न मला विचारायचा होता : प्रश्न होता आपल्या आडनावाबद्दल. ब्रोकर हे आपलं आडनाव जरा वेगळं आहे नाही ?

ब्रोकर : होय. आणि वेगळं आहे म्हणून तर आम्ही ते लावलं होतं. म्हणजे वडिलांनी ते आडनाव लावण्याचा प्रश्नच नव्हता. पोरबंदरला मी 'गुलाबदास हरजीवनदास' एवढंच नाव लावत होतो. पुढं मॅट्रिकसाठी मी मुंबईला आलो. भर्डा हायस्कूलमध्ये नाव दाखल करायला गेलो. तिथं 'आडनाव' लिहिण्याचा प्रश्न उपस्थित झाला. पण माझ्या वडील भावानं तो आधीच सोडवून ठेवला होता. त्यानं 'ब्रोकर' असं व्यवसायसिद्ध आडनाव लावलं होतं. 'दलाल' आडनावही लावता आलं असतं आम्हाला. पण 'ब्रोकर' इंग्रजी. त्या काळी इंग्रजी आडनावाला अधिक वजन. पुढं माझ्या भावानं 'ब्रोकर' आडनाव टाकून 'शहा' आडनाव धारण केलं; मी मात्र 'ब्रोकर'च राहिलो !

मी : आपलं महाविद्यालयीन शिक्षण कोणत्या महाविद्यालयात झालं ? खास अभ्यासाचे विषय कोणते होते आपले ?

ब्रोकर : १९२६ साली मॅट्रिक उत्तीर्ण झाल्यावर मी एलफिन्स्टन महाविद्यालयात

गेलो. बी. ए. च्या परीक्षेसाठी इंग्रजी व गुजराती हे विषय मी निवडले होते. नरसिंगराव दिवेटिया (गुजराती), ए. बी. गजेंद्रगडकर (संस्कृत), डॉ. पार्कर (इंग्रजी) यांच्यासारख्या निष्णात प्राध्यपकांमुळं ही चार वर्षं छान गेली. शिवाय मध्यंतरी मी काँग्रेसचंही काम करायला सुरुवात केली होती.

मी : त्याकडं कसे वळलात तुम्ही ?

ब्रोकर : १९२८ साली, महात्माजींनी काँग्रेसपक्षसभासद नोंदणीचा देशव्यापी कार्यक्रम हाती घेतला होता. मुंबई शहरासाठी एक संख्या निश्चित केली होती. परंतु नोंदणीची अखेरची तारीख जवळ आली, तरी नियोजित लक्ष्य बरंच दूर राहिलं होतं. वर्तमानपत्रात ही बातमी मी वाचली. मला वाटलं, या बाबतीत आपल्याला काहीतरी करता येईल. म्हणून तडक संबंधित श्रेष्ठींची भेट मी घेतली, त्यांच्याकडून नोंदणीपुस्तकं मिळवली, आणि शेकडयांनी सभासद केले.

पुढं असहकाराच्या आंदोलनात अधिक हिरिरीने आणि सक्रिय भाग घेतला, आणि सोळा महिने तुरुंगवास भोगला.

मी : लेखनाला कधी सुरुवात केलीत आपण ?

ब्रोकर : तुरुंगात असताना लिहावंसं वाटू लागलं मला. पण ते सुद्धा स्वतंत्रपणं वाटलं नाही.

मी : म्हणजे ?

ब्रोकर : म्हणजे काय ते सांगतो. तुरुंगात आमचा एक कंपू होता. कंपूतली मंडळी सुशिक्षित होती, रसिक होती; वाचणारी आणि वादविवाद करणारी होती. एके दिवशी एका अल्पपरिचित सहकैद्यानं एक बाड मला वाचायला दिलं. मलाच का दिलं ? ते वाचायला आणि त्यावर अभिप्राय द्यायला मी पात्र आहे, असं त्याला वाटलं होतं. मी ते बाड वाचलं. आणखीही अशीच काही बाडं मला वाचावी लागली.

तेव्हा माझ्या मनात विचार आला : आपण असं नाही का लिहू शकणार ? साहित्यवाचनाची आवड पहिल्यापासून होती. महाविद्यालयात एखाददोन कविता लिहिल्या होत्या; एक-दोन गोष्टी-कवितांची भाषांतरं केली होती. पण आपल्याला लिहिता येईल असं काही मनोमन वाटलं नव्हतं. ती बाडं वाचल्यावर वाटलं प्रयत्न करून पाहायला हरकत नाही.

मग प्रश्न उभा राहिला : काय लिहायचं ? कशावर लिहायचं ? प्रश्नाचं मोघम उत्तर सहज मिळालं : पाहायचं; आणि पाहिलं त्यावरच लिहायचं. तुरुंगात पाहण्यासारख्या गोष्टी आढळूही लागल्या. आता हीच गोष्ट पाहा : एक देशभक्त पारशी तुरुंगात होता. देशभक्तीच्या पाया त्याच्या संसाराचा उन्हाळा झाला होता. अखेर वैतागून त्याची बायको त्याला सोडून गेली. तसं तिनं तुरुंगात पत्र पाठवून त्याला कळवलं. बिचारा पारशी. चूक त्याची नव्हती; त्याच्या बायकोचीही नव्हती. नियतीनं त्यांचं सहजीवन उधळून टाकलं होतं....या

हकीगतीवर मी पुढं 'तीन पत्रे' ही कथा लिहिली. आणखीही काही कथा मी चोरून लिहिल्या.

मी : चोरून ?

ब्रोकर : हो. कारण मी जे लिहीत होतो, आणि जसं लिहीत होतो; त्याबद्दल माझा मलाच खात्री नव्हती. एक गोष्ट मला सारखी जाणवत होती : मुनशी, धूमकेतू या मातबर गुजराती साहित्यिकांसारखं मला लिहिता येत नव्हतं. त्यांच्यासारखं स्वप्नाळू, शैलीदार लिहिणं साधतच नव्हतं मला. म्हणजे मी तसं लिहिण्याचा प्रयत्न केला, आणि मला ते जमले नाही, असं नाही झालं. मी आपलं लिहिलं तेच साधंसुधं लिहिलं. बिनभपकेबाज आणि रोखठोख लिहिलं.

मी : या 'चोरून' लिहिलेल्या गोष्टी प्रसिद्ध कधी झाल्या ? कोणी केल्या ?

ब्रोकर : तेही एक सांगण्यासारखं आख्यान आहे. १९३५ साल होतं. माझ्या मित्रांनी काही कविता लिहिल्या होत्या. त्या मित्रांना मी रामनारायण पाठकांकडे घेऊन गेलो. पाठकांशी माझा थोडा परिचय होता. पाठक गुजरातीतले प्रख्यात साहित्यिक शिवाय 'प्रस्थान' या दर्जेदार नियतकालिकाचे विचक्षण संपादक. आज 'सत्यकथे'ला मराठीत जे स्थान आहे ते गुजरातीत 'प्रस्थान'ला होतं.

मित्रांच्या कवितांच्या निमित्तानं, आपणही काही कथा लिहिल्या आहेत, याचं स्मरण मला झालं. तोपर्यंत ती गोष्ट मी पार विसरून गेलो होतो. माझ्या कथा भीत भीत मी पाठकांना दाखवल्या. आणि त्यांची प्रतिक्रिया पाहून मला आश्चर्याचा धक्का बसला. त्यांनी माझ्या कथा 'प्रस्थान'मधून प्रसिद्ध होतील असं सांगितलं.

त्याप्रमाणं 'लता काय सांगणार होती ?' ही माझी कथा 'प्रस्थान'मधून प्रसिद्ध झाली आणि तिचा भारीच बोलबाला झाला. लता नावाच्या एका विवाहितेचं पतीच्या मित्रावर मन जातं; तोही तिच्याकडे आकर्षिला जातो; पण या चारटचा संबंधातून काही अघटित घडू नये यासाठी तो परागंदा होतो; पतीनं याचं कारण विचारल्यावर बिचारी लता काय सांगणार होती ?—अशी या कथेची रूपरेषा होती...

---

'श्री. गुलाबदास ब्रोकर यांची नजर शोधक आहे. मानवी स्वभावातल्या सूक्ष्म हालचाली न्याहाळणे आणि त्या कलावंताच्या अलिप्ततेने व्यक्त करणे हे श्री. ब्रोकर यांच्या कथालेखनाचे वैशिष्ट्य आहे. या सगळ्या कथा-लेखनातून माणुसकीची तळमळ भरून राहिली आहे. परंतु या माणुसकीभोवती त्यांनी सांकेतिक नैतिकतेची धावळी गुंडाळलेली नाही, किंवा राजकीय रंगही तिला फासलेले नाहीत.'

—'जीवनसरिता' या कथासंग्रहाच्या मलपृष्ठावरील रसग्रहणातून
—मंगेश पाडगावकर

---

कथा प्रसिद्ध झाली, आणि लगोलग सुंदरम्सारख्या श्रेष्ठ गुजराती कवीनं 'लताने हे सांगितले' या शीर्षकाची एक कथा लिहून, माझ्या कथेच्या अखेरीस विचारलेल्या प्रश्नाचं उत्तर देण्याचा अभिनव प्रयत्न केला. सुंदरम्नंतर इतरांनीही अहमहमिकेनं असाच प्रयत्न केला. या साऱ्या कथा 'प्रस्थान'मधून प्रसिद्ध झाल्या. अल्पावधीत माझ्या नावाचा चांगलाच गाजावाजा झाला. मग मात्र मी वेगानं कथा लिहू लागलो.

मी : आपलं पहिलं पुस्तक कधी प्रसिद्ध झालं? त्याचं स्वरूप काय होतं?

ब्रोकर : १९३८ साली. कथासंग्रह होता तो. नाव होतं 'लता आणि इतर गोष्टी.' श्री. रामनारायण पाठकांची प्रस्तावना होती त्याला.

मी : त्याचं स्वागत कसं झालं?

ब्रोकर : सामान्य वाचकांना ते फारसं आवडलं नसावं. त्यातली स्त्री-पुरुष-संबंधचित्रणातली धिटाई आणि सूक्ष्म मानसिक आंदोलनांचं वर्णन करण्याचा प्रयत्न सामान्य वाचकाला चटकन आवडण्यासारखा नव्हता. काही टीकाकारांना मात्र कथासंग्रह आवडला. श्री. जव्हेरीचंद मेघानींसारख्या ज्येष्ठ साहित्यिक–टीकाकारानं त्याचं तोंड भरून कौतुक केलं.

मी : कथा या वाङ्मयप्रकारात तुम्ही विशेष रमला असलात तरी इतरही वाङ्मयप्रकार हाताळले असतील ना तुम्ही?

ब्रोकर : हो तर. मी कविता लिहिल्या, टीकालेख लिहिले, निबंध लिहिले, भाषांतरं केली, नुकतं एक प्रवासवर्णनही लिहिलं. पण मी विशेष रमलो कथा आणि नाटक-एकांकी या दोन वाङ्मयप्रकारात.

मी : तुमच्या नाटक-एकांकिकांबद्दल काही माहिती देणार का?

ब्रोकर : माझ्या कथा हळूहळू लोकप्रिय झाल्या. त्यांच्याबद्दल चर्चा होऊ लागली. माझ्या कथात संवाद फार कमी असतात, अशी एक टीका झाली. तेच माझ्या कथांचं लक्षणीय व गौरवास्पद वैशिष्ट्य आहे, असं इतरांनी आवर्जून सांगितलं. श्री. रतिलाल छाया नावाच्या माझ्या मित्रानं मला संवाद लिहिता येत नाहीत,

---

'गुलाबदास पुष्कळ वर्षे लिहीत आहेत. जवळजवळ तीस वर्षे म्हणा ना. परंतु त्यांच्यामागून उदयाला आलेल्या काही लेखकांचा माध्यान्हकाल संपून गेला आहे, आणि काही लेखक दहा बारा वर्षे चमकून मावळू लागले आहेत. गुलाबदासांचा तारा मात्र अधिकाधिक चमकत राहिला आहे.

अन्य भारतीय भाषात आणि परदेशी भाषातदेखील ज्या एका गुजराती लेखकाच्या कथा विशेषत्वानं अनुवादित झाल्या आहेत तो लेखक म्हणजे गुलाबदास ब्रोकर.'

—'अभिगम' या ग्रंथातील व्यक्तिचित्रातून
श्री. मनसुखभाई जव्हेरी

---

अशी या वैशिष्ट्याची कारणमीमांसा केली.

मी चिडलो. मी तसा जिद्दी आणि चिवट माणूस आहे. श्री. रतिलाल छाया यांची टीका फोल ठरवण्यासाठी मी एकांकिका लिहायला सुरुवात केली.

पुढ मी आणि जयंती दलाल 'एकांकी' नावाच्या नियतकालिकाचे संपादक झालो. 'एकांकी 'ला मजकूर कमी पडला की आम्हाला त्याची भर करावी लागे. मुंबई आकाशवाणीनंही माझ्याकडून काही एकांकी लिहवून घेतल्या आहेत.

इब्सेनच्या 'घोस्ट्स' या नाटकाचं 'भुतावळ' या नावानं भाषांतर केलं आहे मी. माझ्या 'मनना भूत' या नाटकाचं मराठीत भाषांतर होत आहे.

मी : आपल्या कथा–नाटकातून प्रामुख्यानं कोणत्या प्रकारचे अनुभव व्यक्त होतात ? आणि ते कशाप्रकारं व्यक्त होतात ? (या संदर्भात जिज्ञासू वाचकांनी 'जीवनसरिता' हा मराठीत अनुवादलेला गुलाबदासांच्या कथांचा संग्रह पाहावा. अनुवाद श्री. मृणालिनी देसाई यांनी केला असून तो मोठा मोहक उतरला आहे. प्रस्तुत संग्रह साधना प्रकाशनाने १९६३ साली प्रसिद्ध केला आहे.)

ब्रोकर : जे मध्यमवर्गीय व उच्चवर्गीय जीवन मी पाहिलं त्याचंच चित्रण करायचा प्रयत्न मी केला. हे अगदी स्वाभाविकपणंच घडलं. वास्तव चित्रण करायची पद्धती आहे माझी. माणसांच्या मनातल्या सूक्ष्म हालचाली टिपण्याचं मला आकर्षण आहे.

मी : आपल्या लेखनात हेतुपुरस्सर काही प्रयोग केले आहेत काय ? त्यांच्याबद्दल वाचकांची काय प्रतिक्रिया झाली ?

ब्रोकर : हेतुपुरस्सर लेखनप्रयोग मी केले आहेत, असं नाही वाटत मला. कथेच्या रचनेत क्वचित नावीन्य आणण्याचा प्रयत्न केला असेल; पण तो काही 'हेतुपुरस्सर प्रयोग' नव्हे. मी आपला लिहीत होतो. टीकाकारांना आणि वाचकांना प्रसंगी त्यात वेगळेपणा आणि नावीन्य आढळलं. माझं सीधंसाधं लिहिणं सीधंसाधं असल्यामुळंच प्रभावी आहे, अशी चिकित्सा काहींनी केली आहे.

मी : कोणते पाश्चात्य आणि भारतीय लेखक तुम्हाला विशेष आवडतात ?

ब्रोकर : पाश्चात्य लेखकात कथा–कादंबऱ्यांसाठी टॉलस्टॉय, चेकॉव्ह, मोपाँसा, हेमिंग्वे, कामू हे लेखक मला फार आवडतात. सार्त्र आवडतो त्याच्या नाटकांसाठी. तसाच युजीन आयनेस्को.

भारतीय लेखकात रवींद्रनाथ टागोर, ताराशंकर, प्रेमचंद, आर्. के. नारायण आणि अर्थात गुजरातीतले उमाशंकर, सुंदरम् हे लेखक मला विशेष आवडतात. गुजरातीत अनुवादलेली श्री. श्री. ना. पेंडसे यांची 'गारंबीचा बापू' ही कादंबरी मी वाचली आहे आणि ती मला मोठी दर्जेदार कादंबरी वाटली. कवी पु. शि. रेगे यांच्या कविता मला आवडतात.

मी : आता एक जरा खवट प्रश्न विचारतो : गुजरातीमधल्या नव्या पिढीला

तुमच्याबद्दल काय वाटतं ? त्यांच्या लेखी तुमच्या कर्तृत्वाची किंमत काय आहे ?

ब्रोकर : गुजरातीमधल्या नव्या पिढीच्या लेखकांशी माझे व्यक्तिगत संबंध चांगले आहेत. माझ्या साहित्याचं जाहीर मूल्यमापन त्यांनी फारसं केलेलं नाही; पण मला माहीत आहे, त्यांना माझं साहित्य आवडत नाही. माझंच असं नाही, आमच्या जुन्या पिढीचंच साहित्य त्यांना आवडत नाही. अहो, सुंदरम्–उमाशंकरसारख्यांच्या काव्याची ते 'निबंध' म्हणून संभावना करतात, मग माझ्यासारख्याची काय कथा ? मी म्हणतो निदान या बाबतीत तरी सुंदरम्–उमाशंकरसारखे साहित्यिक आमचे साथीदार आहेत.

पण नव्या पिढीला मी सर्वस्वी दोष देत नाही. त्यांची काही टीका रास्तच होती.

मी : आपल्यावर सातत्यानं टीका करणारा टीकाकार होता का कोणी ?

ब्रोकर : हो. आमचे चुनीलाल मडिया होते ना. त्यांनी माझ्यावर नेहमीच टीका केली. त्याची कारणं अनेक असू शकतील. एक कारण असं की ते स्वत: फार वरच्या पट्टीत लिहीत; उलट माझं लेखन फारच सौम्य आहे, ते त्यांना कसं आवडावं ? शिवाय मी वयानं वडील. वडीलकीमुळं काही मान मला अधिक मिळत. अन्य काही गुणांमुळंदेखील साहित्यिक दरबारात माझी चहा जास्त होई.

पण असं असलं, आमचे वैयक्तिक संबंधही दुरावलेले असले तरी परस्परांबद्दल एक चमत्कारिक जिव्हाळा आम्हाला वाटत असला पाहिजे. मडियांच्या माझ्याबद्दलच्या जिव्हाळ्याचं प्रत्यंतर एका प्रसंगी मला विशेषत्वानं आलं. तो प्रसंग मी कधी विसरणार नाही. श्री. उमाशंकर जोशींची आजारी पत्नी सांताक्रूझच्या एका इस्पितळात होती. तिची प्रकृती अचानक आणखी ढासळली. समाचारासाठी आम्ही काही

---

## गुलाबदास ब्रोकर

**जन्म :** २७ सप्टेंबर, १९०९.

**व्यवसाय :** शेअर ब्रोकर (आता निवृत्त)

**प्रकाशने :**

**कथासंग्रह**

१ : लता आणि इतर गोष्टी. २ : वसुंधरा आणि इतर गोष्टी. ३ : भर रस्त्यावर. ४ : सूर्या. ५ : प्रकाशचे स्मित. ६ : पुण्य मेलेले नाही. ७ : हरीचा पथ. इत्यादी.

**नाटके – एकांकी**

१ : धूम्रवलय : नाटक : श्री. मेहता यांच्या सहकार्याने.

२ : ज्वलंत अग्नी : एकांकिका–संग्रह.

३ : भुतावळ : इब्सेनच्या 'घोस्ट्स्'चा गुजराती अनुवाद.

४ : मनाचे भूत : नाटक.

**कविता**

१ : वसंतात.

**टीका**

१ : रूपसृष्टीमध्ये. २ : अभिव्यक्ती.

**प्रवास वर्णने**

निळ्या आभाळाच्या खाली.

---

मित्र इस्पितळात जमलो होतो. मी होतो, मडियाही होते. थंडीचा कडाका पडला होता. रात्री आम्ही तिथंच मुटकुळी करून पडलो. मला थंडी फार वाजत होती. पाय पोटाशी घेऊन मी खुडकुन पेंगत होतो. डोळ्यावर झापड होती. अचानक शरीराला ऊब जाणवू लागली. म्हणून मी जागा झालो. पाहिलं तो माझ्या अंगावर आपला लोकरीचा कोट पसरून चुनीलाल मडिया बाजूला झाले होते !

मी : गुजराती साहित्यातल्या सद्यःस्थितीबद्दल तुमचं काय मत आहे ?

ब्रोकर : गुजरातीतले ताज्या दमाचे नवे साहित्यिक काही नवं आणि जोमदार जरूर निर्माण करत आहेत. चंद्रकांत बक्षी (पॅरेलेसिस), मधू राय (कामिनी), महंमद मांकड यासारखे कादंबरीकार कादंबरीलेखनात नवे प्रयोग करताहेत. काव्य, कथा, टीकालेख यासारख्या क्षेत्रात लक्ष वेधून घेणारी कामगिरी झाली आहे. ॲप्लाइड क्रिटिसिझम–साहित्यकृतींचं विश्लेषण व रसग्रहण करणारी टीका फारशी चांगली होत नाही, याचा मला खेद होतो.

मी : आणि नाटकं ? (गुजरातीमध्ये स्वतंत्र नाट्यलेखन फारसे होत नाही. बहुतेक नाटके अनुवादित. असे का असावे, हे जाणून घ्यायची उत्सुकता होती मला.)

ब्रोकर : आमच्याकडं स्वतंत्र नाटकं जवळजवळ नाहीतच. अनुवादावरच काम भागवलं जातं. नाटक हा धंदा आहे, एवढीच गोष्ट इथं ध्यानात घेतली जाते. त्यामुळं कोणताही धोका पत्करायला मंडळी तयार नसतात. म्हणून अन्यभाषी रंगभूमीवर यशस्वी झालेल्या नाटकांची उचल आम्ही करतो.

मी : नव्या पिढीला खरोखरच नवीन काही सांगायचं आहे का ? आणि जे सांगायचं आहे ते नव्या पद्धतीनंच सांगायला पाहिजे का ? का ही नवता पाश्चात्यांच्या अनुकरणाच्या हव्यासातून उत्पन्न झाली आहे ?

ब्रोकर : नव्या पिढीचे सच्चे, प्रामाणिक प्रतिनिधी खरोखर नवं काही सांगायची धडपड जरूर करत आहेत, असं मला वाटतं. सांगणं नवं असल्यामुळं सांग-

---

'गुलाबदासांच्या साहित्यसृष्टीत भले केवळ मध्यमवर्गाचे चित्रण असेल, पण त्यात बालके आहेत, तरुण आहेत, वृद्ध आहेत; आदर्शपरायण सज्जन आहेत आणि धूर्त व दांभिकही आहेत; सच्चे प्रणयीजन आहेत आणि रंगेल कामुक आहेत; पिता, पुत्र आणि मित्र आहेत; माता, कन्या, पत्नी आणि प्रेयसी आहेत. ...जीवनातील सुगंध आणि दुर्गंध, शुचिता आणि मालिन्य, महत्ता आणि क्षुद्रता, कारुण्य आणि काव्य, या साऱ्यांचे चित्रण गुलाबदासनी केले आहे. आणि ते कलाकाराच्या तटस्थतेने केले आहे.'

—'अभिगम' या ग्रंथातील व्यक्तिचित्रातून
श्री. मनसुखभाई जव्हेरी

---

ण्याची पद्धती आपोआप नवी होते. ...पण प्रत्येक पिढीत असतात तसे नव्या पिढीतदेखील अति उत्साही नकलिये (नक्कल करणारे) आहेत. उदाहरणार्थ, काफ्का, रिल्के, सार्त्र आणि कामू हा आमच्या नव्या पिढीची दैवतं आहेत; पण ह्या दैवतांची नीट ओळख सर्वांनाच आहे, असं नाही.

मी : ब्रोकरसाहेब, आता इतकं बोलणं झाल्यानंतर, तुम्हाला बक्षीसं वगैरे कोणती मिळाली आहेत, असं मी विचारलं तर उत्तर द्यायचा संकोच वाटायला नको.

ब्रोकर : बक्षीसं, मानसन्मानांच्या बाबतीत मी भाग्यवान आहे. केवळ त्यांच्याबाबतीत कशाला, एकूणच मी भाग्यवान आहे. जिथं माझं रुपयाभर कौतुक व्हायला पाहिजे तिथं एक रुपया आणि वर पन्नास पैसे कौतुक सतत वाट्याला आलंय माझ्या.

माझ्या कथा–नाटकांना सरकारतर्फे व स्पर्धांतून पारितोषिकं मिळाली आहेत.

भारतीय साहित्य अकादमीच्या गुजरातीविषयक सल्लागार मंडळाचा तसंच पी. इ. एन्. च्या कार्यकारी मंडळाचा सभासद आहे मी. गुजराती साहित्य परिषद आणि गुजराती लेखक मिलन या संस्थांच्या संयुक्त कार्यवाहांपैकी मी एक आहे. 'परब' या साहित्य परिषदेच्या त्रैमासिकाच संपादन मी करतो.

कथाकार या भूमिकेत मी विदेश दौऱ्यांवर गेलो आहे. अनेक भारतीय आणि विदेशी भाषातून माझ्या कथांचे–एकांकी–नाटकांचे अनुवाद झाले आहेत.

मी : आता अखेरचा प्रश्न. गुजरातीतली पाच श्रेष्ठ पुस्तकं, अर्थात तुम्हाला खास आवडणारी, आमच्या मराठी वाचकांसाठी सांगणार का?

ब्रोकर : हे काम अवघड आहे हो. तुमचं पाच पुस्तकांचं बंधन सांभाळणं कसं जमणार? त्यात थोडी सवलत घेतो आणि सांगतो.

१ : सरस्वतीचंद्र : गोविंदराम त्रिपाठी.

२ : गांधीजींची आत्मकथा.

३ : गुजरायनो नाथ किंवा जय सोमनाथ : कन्हैयालाल मुनशी.

४ : नान्हालाल अथवा कान्त यांचे काव्य.

५ : पॅरेलेसिस (चंद्रकांत बक्षी) किंवा झंशा (रावजी पटेल).




ॲडव्होकेट
माधव
कानिटकर

लेखांक
दोन

सब–इन्स्पेक्टर शिवप्रसाद यांचे पुष्कळसे काम सोपे झाले होते. तुरुंगातील दरोडेखोरांनी बंद केलेले सर्व हवालदार, आतला एकमेव आरोपी लालमशी यांनी आरोपींना प्रत्यक्ष पाहिले होते; शिवाय सकाळी पंजाब नॅशनल बँकेसमोरच रहाणारे डॉक्टर बाळकृष्ण बसमधून दरोडेखोर त्या बसचा ड्रायव्हर, त्यांना बस स्टँडकडे जाताना पहाणारा दूधवाला मोतीसिंग हे आपणहून पोलीस स्टेशनवर हजर झाले. त्यांच्यापैकी प्रत्येकाने छातीठोकपणे सांगितले की, 'मी दरोडेखोरांना प्रत्यक्ष डोळ्यांनी पाह्यलय. मी त्याना सहज ओळखू शकेन-' सब-इन्स्पेक्टर शिवप्रसाद यांनी या सर्वांची स्टेटमेंटस् रेकॉर्ड केली. बसच्या मडगार्डवर, स्टेअरिंग व्हीलवर, खिडक्यांच्या कांचेवर त्यांचे ठसे मिळाले होतेच. शिवाय पोलीस स्टेशनच्या भिंतीला तिरकस लावून ठवलेल्या लाकडी फळीवर व पोलीस स्टेशनच्या आवारात त्यांच्या पायांचे ठसे मिळाले. कायद्याच्या क्षेत्रात असं म्हटलेलंच आहे की प्रत्येक भयंकर गुन्हेगार गुन्हा करताना ज्या लहान सहान चुका नकळत करतो त्या चुकाच पोलिसांना त्याला पकडायला मदत करतात.

डेप्युटी इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलीस, स्टेट ऑफ पंजाब, यांचे सब-इन्स्पेक्टर शिवप्रसाद यांच्या 'चौकशी'वर लक्ष होतच. त्यांनी सब-इन्स्पेक्टर शिवप्रसाद

यांच्या कामाबद्दल समाधान व्यक्त केलं पण लगेच त्याला खडसावलं, " हे बघ ! कुणाचही काम कधी सोपं किंवा कमी होत नसतं. ते जेवढं करायला पाहिजे तेवढं करावं लागतंच. तुझ्या कामाची प्रगती ठीक आहे पण उपयोग काय त्याचा ? अजून आरोपींनी चोरलेला मुद्देमाल मिळायचाय; मुख्य म्हणजे अजून एकही आरोपीला अटक झालेली नाही. उपयोग काय तुझ्या आत्तापर्यंतच्या कामाचा ? चल लवकर ! आरोपींच्या मागे लाग ! "

... आणि नतर एक अजब प्रकार सुरू झाला. ज्यांना पूर्वी दरोडेखोरीबद्दल सजा झालेली होती अशा दाखलेबाज लोकांना, कुप्रसिद्ध गुंडांना (Bad characters) संशयावरून अटक करण्यात आली. दररोज रात्री १२॥ नंतर सब-इन्स्पेक्टर शिवप्रसाद व इतर वरिष्ठ पोलीस अधिकारी एकेकाला इनक्वायरी रूममध्ये घ्यायचे, आणि १२॥ ते ४॥ त्याला प्रश्न विचारून हैराण करायचे. प्रश्नांचा मुख्य खाक्या असे तो हा की, ' १ एप्रिल १९५७ च्या संध्याळकापासून २ एप्रिलच्या सकाळपर्यंत तू कुठे होतास ?'

'तुला या दरोड्याबद्दल काय माहिती आहे ?'

उत्तर सरळ येवो किंवा वाकडं. शेवटी पोलीसी खाक्याला सुरुवात होत असे. कुठलातरी पोलीस अधिकारी त्याच्या कानफटात देत असे. अशी सणसणीत की पूर्वी केलेला गुन्हा त्याला आठवावा ! कुणी त्याचा हात पिरगाळीत असे, कुणी त्याला आडवा पाडून त्याच्या तळपायांवर जाडजूड लाकडी दांडा मारीत असे. याला म्हणतात नालबंदी ! आरोपी ओरडायचा, रडायचा, शेवटी असह्य झालं म्हणजे जिवाच्या आकांताने ओरडून सांगायचा, ' साहेब, मला मारू नका. मी खरं सांगतो, मला यातलं काही माहिती नाही, काही माहिती नाऽऽही, काही माहिती नाऽऽही. ' पहाटे पहाटे पोलीस अधिकाऱ्यांची खात्री पटायची की 'त्या' दरोड्यात हा नसावा ! दुसऱ्या दिवशी सकाळी मॅजिस्ट्रेट कोर्टात पंजाब पोलीस त्याला डिसचार्ज द्यायचे. असा जबरदस्त मार १०० च्या वर लोकांनी खाल्ला आणि ते दुसऱ्या दिवशी सुटले. एकदा दाखला झाला किंवा गुंड म्हणून बदनाम झालो तर काय परिणाम होतात ते त्यांना कळलं ! आणि गंमत अशी की एकूण आठ दरोडेखोरांपैकी दोघांना पोलिसांनी संशयावरून अटक केली होती. कारण त्यांचे दाखले होते. त्यांना जाम ठोकले होते. पण निदान त्यावेळी तरी ते पंजाब पोलिसांपेक्षा अधिक हुशार निघाले. मार खाता खाता रडत रडत त्यांनी पोलीस अधिकाऱ्यांना सांगितले होते, ' काय साहेब उगाच मारता ? मागे एकदा सजा लागल्यापासून सगळी वाईट कामं सोडली आम्ही !'

पोलिसांनीही विचार केला, ' हा दरोडा धाडसी होता, पूर्वनियोजित होता. आरोपी एकूण ८ होते. हे दोघे भर बाजारात सहज सांपडले त्या अर्थी दरोड्यात भाग घेणारांपैकी हे नसावेत. बहुतेक पूर्वीचा दाखला होता म्हणून उगाच धोपटले बिचाऱ्यांना. पोलिसानी या दोन दरोडेखोराना सोडून दिले !

...असेच पंधरा दिवस गेले. अजून कुणालाच अटक झाली नव्हती. सब-इन्स्पेक्टर शिवप्रसादांची हिम्मत खचत चालली पण डेप्युटी इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलीस अश्विनकुमार अनुभवी होते. पोलीस अधिकाऱ्यांच्या एका सभेत बोलताना ते म्हणाले, 'निराश होऊ नका. गुन्हा जेवढा मोठा तेवढं पोलीसांचं काम सोपं! आत्तापर्यंत पुष्कळ पुरावा गोळा केलाय आपण. डोळ्यात तेल घालून लक्ष ठेवा. एका जरी आरोपीला अटक झाली तरी बाकी सगळे ताबडतोब ताब्यात घेऊ आपण. अशा प्रकरणात प्रत्येक गुन्हेगाराला आपल्या जिवाची काळजी असते. गुन्हा करून झाला की ते भेदरलेलेच असतात. आपल्या सुदैवाने दरोडेखोर आपसात भांडले तर आपल्याला त्यांच्यापैकीच कुणीतरी इन्फरमेशन देईल...'

आणि बोलाफुलाला गाठ पडली! पोलीस स्टेशनमधला फोन खणखणला. सब–इन्स्पेक्टर शिवप्रसाद तत्परतेने पुढे झाले. ते फोनवर बोलणार होते की, 'थोड्या वेळाने फोन करा. D. I. G. P. मिटींगमध्ये बोलताहेत.'

पण नशीब! आयत्या वेळेला त्यांना असं वाटलं की असं बोलणं कदाचित D. I. G. P. नाच आवडणार नाही. त्यांनी रिसिव्हर उचलला आणि नेहमीच्या सवयीप्रमाणे म्हटले,

'हॅलो! मुकेरियन पोलिस स्टेशन सब-इन्स्पेक्टर शिवप्रसाद हियर.'

'हॅऽऽलो साहेब! पोलीस स्टेशन आणि बँकेवर हल्ला झाला ना? त्यात रूरा होता!'

'रूरा? कोण रूरा? तू कोण बोलतोयस?'

घाईघाईने धाप लागल्यासारखा आवाज दुसरीकडून आला. 'साहेब, मी माझं नाव सांगणार नाही. जगायचंय मला. रूरा ६ महिन्यापूर्वीच जेलमधून सुटला. आत्ता चुहारपूर नावाच्या खेड्यात रहातो...'

...आणि या वाक्यानंतर टेलिफोन डिस्कनेक्ट झाला. सब-इन्सपेक्टर शिवप्रसाद यांचा आनंद गगनात मावेना. मिटींगमध्ये जाऊन त्यांनी D. I. G. P. ना सलाम ठोकला आणि ते म्हणाले, 'सर! गुड-न्यूज! आत्ताच इन्फरमेशन आली की दरोड्यात रूरा म्हणून कुणी माणूस होता.'

डेप्युटी इन्स्पेक्टर जनरलने मित्रत्वाच्या नात्याने सब-इन्सपेक्टर शिवप्रसादच्या खांद्यावर थोपटले आणि ते म्हणाले, 'यंग मॅन! इन्फरमेशन आणि मिसगायडिंग यातला फरक तुला कळला पाहिजे. पोलीस ऑफीसर आहेस तू!'

...आणि एकदम वळून ते सर्व पोलीस अधिकाऱ्यांना करड्या आवाजात म्हणाले, 'एनी वेऽऽ! या रूराला २४ तासाच्या आत अटक झाली पाहिजे.'

...D. I. G. P. नी हा हुकूम दिला तो दिवस होता १६ एप्रिल १९५७. वेळ रात्री ९ ची. D. I. G. P. आपली काठी घेऊन दाणदाण पावलं टाकीत निघून गेले. इतर कनिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची धांदल उडाली. टाकोटाक फिल्लापूरच्या फिंगर प्रिंट ब्यूरोला टेलिफोन गेला की, 'रूरा नावाच्या कुठल्या इसमाचा

फिंगर प्रिंट असला तर ताबडतोब इकडे घेऊन या. D. I. G. P. ची ऑर्डर आहे !'

पोलीस व्हॅनस् धावू लागल्या. प्रत्येक जेलरला विचारणा झाली की, 'रूरा नावाचा कोणी कैदी इकडे होता ? आम्हाला त्याची माहिती पाहिजे. D. I. G. P. ची ऑर्डर आहे !'

...आणि आला ! फिंगर प्रिंट ब्यूरोकडून रिपोर्ट आला की, आमच्याकडे रूराचे फिंगर प्रिंटस् आहेत ! एका जेलरने रूराचा फोटो, त्याचे आंगठ, त्याने भोगलेली सजा, इत्यादीसबंधी माहिती दिली. आणि १७ एप्रिल १९५७ ला ला सकाळी ५॥ वाजता पोलीस व्हॅन निघाली. चलो ! चुहारपूर व्हिलेज ! व्हॅन सकाळी ६ वाजता चुहारपूरच्या जंगलात पोचली. रूराच्या घरावर धाड पडली. रूरा घरात नव्हता. १७–१८ आणि १९ एप्रिल १९५७, सतत ३ दिवस पोलीस जंगलात लपून राहिले. रूरा आला नाही. शेवटी एक पोलीस साध्या वेषात चुहार-पूर गावात शिरला ! गुन्हेगार सापडतो तो नेहमी दारूच्या अड्डयावर किंवा नाक्यावर. गावातल्या तिठ्यावर चार-पाच माणसं चिलीम ओढत बसली होती.

हवालदार त्यांच्यात घुसला !

" रामराम मंडळी ! इथे रूरा कुठे रहातो ?"

'त्या समोरच्या घरात रहातो. का ? '

'तिकडे जाऊन आलो मी ! भेटला नाही. जरा खाजगी काम आहे.'

...झालं ! मंडळींना वाटलं हा रूराचा खास दोस्त आहे ! त्यांच्यातलाच एक सहज बोलला, 'अरे तो बाजूच्याच खेड्यात गेला असेल. त्याच्या दोस्ताकडे उद्या गटारी अमावास्या आहे ना ! उद्या त्याची पार्टी तिकडे !'

...हवालदाराने बोलता बोलता रूराचा नवा पत्ता काढला आणि तो परत गेला.

हवालदाराने आणलेली 'खबर' सब-इन्सपेक्टरने ऐकली. तो बुद्दू नव्हता. त्याने अर्धे पोलीस आणि एक सब-इन्सपेक्टर चुहारपूरमध्येच ठेवले आणि ३० कॉन्स्टेबल्स बरोबर घेऊन तो बाजूच्या खेड्यात घुसला. त्याने वाटेतच सगळ्यांना ताकीद दिली होती की, आता रूराची चौकशी करायची नाही ! फक्त तो येतो का नाही ते पहायचं.' पोलीसांनी जाळं फेकलं. १५ हवालदार रूराच्या घरावरून चक्कर मारून गेले. तर १५ हवालदार आणि एक सब-इन्सपेक्टर जंगलात दबा धरून बसले.

आता संध्याकाळचे ६–४५ वाजले होते. हळू हळू काळोख पडू लागला होता.... इतक्यात !...इतक्यात खालच्या दरीतून रूरा चालत वर आला. त्याच्या हातात बंदूक होती ! इन्स्पेक्टरने हवालदारांना सावध केले. रूराचा फोटो त्यांनी आता-पर्यंत १००० वेळा पाहिला होता. त्यांनी बॅटरी मारली आणि तो माणूस थबकला ! रूरा ! त्याने बंदूक खांद्यावरून काढली. पण इन्स्पेक्टरने जागा बदलली ! आणि शिटी मारली. अतिउत्साहाने आणि रागारागाने (In their excitement and anger) १५ हवालदार लाठ्या-काठ्या घेऊन रूरावर तुटून पडले. रूरा कमी



नव्हता. त्याने खूप दंगल केली. १५ हवालदारांना एकटा रूरा भारी पडला. पण अखेर पोलिसांनी त्याच्या हातात बेड्या ठोकल्याच.

...रूराच्या पाठोपाठ आणखी दोन खेडूत येत होते. सब इन्सपेक्टरचं नशीब खुललं. त्यांनी त्या दोघांना थांबवलं आणि रूराला विचारलं, 'ही तुझ्याकडे असलेली बंदूक कुणाची आहे ?'

'माझी आहे !'

सब-इन्स्पेक्टरने दोन पंचांसमक्ष ती 'त्याची' बंदूक त्याच्याकडून काढून घेतली ! त्या बंदुकीच्या नळीवर नंबर होता ७५८ आणि लाकडावर अक्षरं कोरलेली होती S. P. I. शिव-प्रसाद ! ही बंदूक मुकेरियन पोलीस स्टेशनची होती.

दुसऱ्या दिवशी 'दि ट्रिब्यून' या पंजाबमधल्या प्रमुख इंग्रजी दैनिकात आणि इतर पंजाबी भाषिक वर्तमानपत्रात ठळक हेडिंग आले--

'पंजाब नॅशनल बँक दरोड्यातील प्रमुख आरोपीला अटक.'

'नाट्यपूर्ण दरोडा ! नाट्यपूर्ण अटक !'

'अखेर रूरासिंग सापडला !'

(क्रमशः)

# नवकलेची सोयीस्कर ढाल नको !

अनंत भिडे

एक चित्रप्रदर्शन – पुणे

नुकतेच म्हणजे दि. ११ ते १३ सप्टेंबर या तीन दिवसांच्या छोटया कालात पुण्याच्या अभिनव कला विद्यालयाच्या आर्टगॅलरीत, लोककवी मनमोहन यांनी काढलेल्या श्रीगजाननाच्या असंख्य अशा चित्रांपैकी केवळ ७५ चित्रांचे एक काहीसे चमत्कृती दर्शक प्रदर्शन पुण्याच्या 'श्री शब्द' तर्फे काही उत्साही युवक मंडळींनी पुणेकर रसिकांसाठी सादर केले होते.

प्रतिवर्षी, गणेश चतुर्थी ते अनंत चतुर्दशी हा १० दिवसांचा काल पुणेकरांना गजाननाच्या मंगलमय वातावरणाने भारून टाकत असतो. सर्वत्र 'गणपतीबाप्पा मोरया' हेच दिसते. ठिकठिकाणी गणेशाच्या मूर्तीबरोबर मांडलेली विविध, आकर्षक अन् वेधक अशी दृश्ये पाहून पुणेकर व आजूबाजूची पाहुणे मंडळी तृप्त होत असतात. सुखावतात. अशाच वेळी हे गणेश चित्रांचे प्रदर्शन भरले होते. कवी मनमोहन हे चित्रकार म्हणून या नव्या कलादालनात प्रवेश करीत असल्याचे वाचून मोठ्या कुतूहलाने अनेकांसारखा मीही प्रदर्शन पाहाण्यास गेलो होतो. या कवीने ही चित्रे कशी निर्माण केली हे प्रथम, त्या कवीच्याच शब्दांत पाहू.

'स्वतःच्या संवेदनाशील मनाच्या गाभाऱ्यातून प्रगट झालेल्या चित्रकृती. अतीव दुःखानं वेड्या झालेल्या मनाला शांततेची गरज होती. आविष्काराला काव्यासाठी शब्द कमी पडू लागले अन् या चित्रकला माध्यमाची मी निवड केली. कागदावर रंग ओतून गणेश मूर्तीचे आकार काढू लागलो. मनातील तरंग या चित्रांच्या रूपानं प्रगट करू लागलो. माझ्यामधला वेडेपणा कागदावर उतरविण्याचं ठरविलं. सतत तीन चार वर्षे चित्रं काढण्याचा चित्रकला साधनेचा एक 'रियाझ'च सुरू ठेवला. टयूबमधले रंग कागदावर उतरून दंगा करायचे. माध्यमाचे अगर साधनांचे बंधन ठेवण्याचे कारण नव्हते. अशा बंडखोरीचं हे दर्शन. केवळ चिंतनातून संवेदनाशील क्षणांचं मनोविश्लेषण घडविणारी चित्रं निर्माण झाली.'

खरंच, बंडखोरीनं, ओढाताणीनं कलाकृती निर्माण होतात का? हा एक विचार करण्याजोगा प्रश्न आहे. या कलाकारानं गजानन हा एकच चित्रविषय निवडला. पूर्ण मोकळ्या मनानं, जे वाटलं ते गणेशरूपात मांडलं असं म्हटलं

म्हणजे नवकलेतील (मॉडर्न) फ्री एक्सप्रेशनचा न कळत वा कळून पूर्ण अंगिकार केला गेला हे निश्चित. असं असता, काही ठरले गेलेले संकेत वा रंग वारंवार चित्रकृतीत का दिसत होते ?

गणपती म्हटला म्हणजे मानवी शरीरावर हत्तीचं डोकं बसलेली आकृती, सोंड, मोठे सुपासारखे कान वगैरे. एखाद्या दगडावर जरासा वळण घेतलेला सोंडेसारखा आकार दिसला की त्यात आपल्याला गणपती दिसतो. तशातच शेंदरी किंवा तांबड्या रंगानं त्याला साथ केली की निश्चितच होतो. हे जणू ठरल्यासारखेच. हा एक संकेत म्हणू या. याचाच उपयोग बहुतेक चित्रांत केलेला होता. बरीचशी म्हणजे दोन तृतीयांश चित्रं या रंगानं नाहून निघालेली दिसली. गणपतीची सोंड ठराविक एका डाव्या दिशेला वळलेली, तसेच तिची लांबीही जवळजवळ सारखीच. याचा परिणाम ठराविक असा होत होता. मग, मनातील तरंगाचा आविष्कार चित्रकृतींतून मुक्तपणानं कसलही बंधन न पाळता होत होता हे पटत नाही. विशिष्ट चित्र वा आकृती आणि तिची विविध रूपं पाहण्यास आपण जात आहोत, तेही तशाच प्रकारचे बाह्य वातावरण असलेल्या दिवसात असं असल्यानं, प्रदर्शन पाहावयास आलेल्या बहुतेकांनी, प्रत्येक चित्रांत गणपती आहेच असं पूर्ण गृहीत धरून पाहिलं असावं. आणि होत नसताना, समाधान होत असल्याचा अभिप्राय देऊन एक बुरखा पांघरला असावा. देवाची चित्रं पाहाताना नावं कशी ठेवा ? अन् एखादा वेडा विचार, चित्रकृती पाहून आलाच तर तो बोलावा कसा ? या विचारानं त्या स्थळी माझ्यासारखे असंख्य प्रेक्षक मुग्ध राहिले असावेत.

बहुतेक चित्रांतील गणपती मांडी घालून बसलेला हेही मूळ विचारांशी जमेना. म्हणजे गणेशाची चित्रं सहज निर्माण झालेली नसावीत. अट्टाहासानं, आवर्जून, रंगाच्या थरातून संकेताच्या भक्कम कुबडीच्या आधारानं काही आकार गृहीत धरूनच ओरबाडली गेली होती असं म्हटल्याशिवाय राहवत नाही. मुक्त आविष्काराला हे पटत नाही. मानवत नाही. वेड्या वाकड्या, निघाल्या तशा, किंवा काढल्या तशा रेघोट्या, वक्र रेषांचं, गुंतागुंतीचं जाळं, एकाच जागी अनेक-वार, अनावश्यक ठरणाऱ्या पण आकारनिर्मितीपोटी अट्टाहासानं निर्माण केल्या गेलेल्या रेषा. हे चित्रकलेचं कोणतं अंग असेल बरे ?

बहुसंख्य चित्रांत प्रामुख्यानं काढण्यात आलेला ठराविक असा सोंडेचा आकार जर त्या त्या चित्रांच्या रंगाच्या रोगणानं क्षणभर झाकला असं म्हटलं अन् ही गणेशाची न म्हणता नुसती चित्रं म्हणून पसरली तर त्यापैकी किती चित्रांतून गणपती दिसेल याबद्दल दाट शंका वाटते. एकच चित्रविषय अन् तोही काही निश्चित स्वरूपात सर्वांपुढं असणारा असा निवडून त्यावर असंख्य चित्रं काढणं हेच अवास्तव वाटतं. मांडलेल्या चित्रात तोच तोचपणा होता. अपवाद एवढाच की काही चित्रांसाठी पिवळा, निळा, काळा रंग निवडला होता. बहुतेक चित्रांतील आकार,



तुमच्या घरकुलांतील
आरोग्याचे कारंजे—
फॉस्फोमिन्®
फॉस्फोमिन
• अधिक उत्साह देते
• भूक वाढविते
• जोम वृद्धिंगत करते
• शरीराची रोग प्रतिकार—
क्षमता वाढविते.
SQUIBB
Phosfomin
VITAMINS ELIXIR
SQUIBB
SARABHAI CHEMICALS
® हा ई. आर. स्क्विब ॲण्ड सन्स,
इन्कॉर्पोरेटेड, यांचा रजिस्टर्ड ट्रेडमार्क
आहे व करमचन्द प्रेमचन्द प्राइवेट लि
यांना तो वापरण्याचे लायसन्स आहे
फॉस्फोमिन —
फलास्वाद असलेले
हिरव्या रंगाचे
व्हिटॅमिनयुक्त टॉनिक.
Shilpi HPMA-35A/70 Mar.

मूळ रंग रोगणाच्या थरांतून खरडून (स्क्रेपिंग, स्क्रॅचिंग) काढण्यात या चित्रकाराचा आग्रह दिसला. मन:प्रसन्न, शांतीदायी चित्रं कुठं होती ? असं असूनही श्रीगजानन हे माझे अशाप्रकारे विश्रांतिस्थान बनलं अस म्हणणं किती चमत्कृतीपूर्ण वाटतं ! सामान्य प्रेक्षकाला किती विश्रांती अन् समाधान लाभलं असेल हे ज्यानं त्यानं ठरवावं.


काव्यासाठी शब्द अपुरे वाटले अन् मनात कोंडलेल्या विचारकाहूराला वाट काढून देण्यासाठी चित्रकला—माध्यम जवळ केलं. अशा स्थितीत त्यातील नवकला प्रकाराला (माडर्न आर्ट) सोईनं जवळ करण्याशिवाय अन्य मार्ग सापडणं अशक्यच. नवकलेला कोणीही जवळ करावं, तिच्यातील काहीशी गूढता समाज समजू शकत नाही म्हणून तिची भली मोठी ढाल पुढं करून चित्रकलेत स्वैरसंचार करावा अन् मनातील विचारतरंगाच्या प्रतिकृती म्हणून अशा विचित्रकृती निर्माण व्हाव्यात ही खऱ्या अर्थानं चित्रकलेची विटंबनाच म्हणावी लागेल. सामान्य प्रेक्षकाच्या सहन-शक्तीला कलाजगात वावरताना जबरदस्त ताण सहन करावा लागतो आहे असे वाटते. देवाच्या एका रूपाचं वैयक्तिक कलादृष्टीतून जरी म्हटलं तरी असं वेडं-वाकडं अन् ओंगळ दर्शन घडविलं जावं ही खेदाची गोष्ट आहे.

अतीव दु:खानं किंवा कठोर आघातानं वेड्यासारखं झालेल्या कोणीही व्यक्तीनं अशा अवस्थेत चित्रकला माध्यमाचा सहज नव्यानं स्वीकार करून आपल्या भरकट-णाऱ्या मनातील विविध हेलकाव्यांचा आविष्कार करण्याचं असं धाडस करावं अन् आधीच, अनेक कारणानं समाजापासून दूर राहिलेल्या त्या आधुनिक चित्रकलेला (मॉडर्न आर्ट) आणखी एक तडाखा द्यावा हे कलाकार मनाला सहन होत नाही. नवकलेचं असं वेडंवाकडं, घाणेरडं दर्शन घडविणं केव्हाही रास्त नाही.

परिणामकारी मुक्त आविष्कारासाठी चित्रं काढताना गजाननाचे चार हात, बहारदार सोंड, सुपासारखे कान अन् मोठं पोट यांचा खरा उपयोग याहीपेक्षा किती तरी पटीनं, पद्धतीनं सूचक म्हणून करून घेता आला असता. मिळेल त्या कागदावर, पृष्ठावर, हाती पडेल त्या रंगाच्या थरावर ओरखडे काढून गणेश चित्र निर्माण करताना कसलेही साहित्य (ब्रश, काडी, चोथा, कोळसा वगैरे) वापरले अन् हे नव्या पद्धतीचे आगळे म्हणून चित्रप्रदर्शन सामोरे आले इतकेच. मन:शांतीसाठी, सद्हेतूने अशी गणेशाची, विघ्नहर्त्याची, सुखकर्त्याची रोज सकाळी वेगवेगळी असंख्य चित्रं काढून या कवी कलाकारानं जी दीर्घकाल उपासना केली ती मात्र अभिनंदनी-यच. एक क्रांतिकारी प्रयोग, समाजाला विचार करायला लावणारा आगळा प्रयोग या दृष्टीनं या कवीच्या चित्रांचं हे प्रदर्शन ज्या 'श्री शब्द' युवकांनी मांडलं त्यांनाही धन्यवाद ! □ □ □

**राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे द्विसाप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर**

MANOOS (Biweekly) : 40 Paise : Regd. No. M–H 649



"ते तिकडे बसलेत ते सुप्रसिद्ध हातभट्टीवाले न् त्यांच्याच बाजूला ते महशूर मटकावाले; तुम्ही दोघांना ओळखलंच असेल. त्या टोकाला बसलेत त्यांना तुम्ही कदाचित् ओळखलं नसेल : ते आहेत गेली ४० वर्षे निरलसपणे देशसेवेचं व्रत घेऊन राहिलेले कार्यकर्ते "